# पुणे महानगरपालिका

## स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ५८, दिनांक २९/३/२०१६**

**सभा क्रमांक ८७, दिनांक २९/३/२०१६ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. २६१३ ते २६२४
दाखल वि.क्र. २६२५ ते २६६१
ठराव क्र. २६१७ ते २६६५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २९/३/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. बोडके बाळासाहेब– अध्यक्ष
२. मा. सौ. अश्विनी नितीन कदम

३. मा. बागवे अविनाश रमेश
४. मा. डॉ. सिद्धार्थ धेंडे
५. मा. पवार राजू उर्फ दत्तात्रय रामचंद्र
६. मा. गोगले सुनिल लालू
७. मा.सय्यद फारूक यासीन उर्फ फारूक इनामदार
८. मा. जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
९. मा. सौ. टिळक मुक्ता शैलेश
१०. मा. सौ. पठारे सुमन बाळासाहेब
११. मा. सौ. ओसवाल दीपाली प्रमोद
१२. मा. श्रीमती. नेटके सुशिला (ओसवाल)
१३. मा. सौ. बाबर आरती साईनाथ
१४. मा. सौ. गलांडे सुनिता मारूती
१५. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत
१६.

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

मा. सौ. रोहिणी चिमटे    मा.    मा.    मा.
मा.    मा.    मा.    मा.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. श्रीमती प्रेरणा देशभ्रतार,अति. महा. आयुक्त (वि.)
३. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
४. श्री. सुनिल पारखी, नगरसचिव
५. मा.अंबरिष गालिंदे,सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक)
६. मा.सुहास मापारी, उप आयुक्त(कआ. व क.सं.)
७. मा. मोरे दगा पितांबर, उपायुक्त (झोनिपु)
८. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (सामान्य प्रशासन)
९. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१०. मा. विलास कानडे, उपायुक्त, स्थानिक संस्था कर
११. मा.प्रशांत वाघमारे, शहर अभियंता
१२. मा.बबन दहिफळे, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
१३. मा.अॅड.थोरात, मुख्य विधी अधिकारी
१४. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
१५. मा. अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक
१६. मा. टि.एस. धारूरकर, जनरल मॅनेजर ऑपरेशन
१७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
१८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
१९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
२०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
२१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
२२. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता(विद्युत)
२३. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
२४. मा.विजय कुलकर्णी,अधी. अभि.(पा.पु.प्रकल्प व सुअरेज ऑप.)
२५. मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा)
२६. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
२७. मा. गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी.

# पुणे महानगरपालिका

## स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ५८, दिनांक २९/३/२०१६**

**सभा क्रमांक ८७, दिनांक २९/३/२०१६ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. २६१३ ते २६२४
दाखल वि.क्र. २६२५ ते २६६१
ठराव क्र. २६१७ ते २६६५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २९/३/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. बोडके बाळासाहेब– अध्यक्ष
२. मा. सौ. अश्विनी नितीन कदम

३. मा. बागवे अविनाश रमेश
४. मा. डॉ. सिद्धार्थ धेंडे
५. मा. पवार राजू उर्फ दत्तात्रय रामचंद्र
६. मा.ॲड्. कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा. गोगले सुनिल लालू
८. मा.सय्यद फारूक यासीन उर्फ फारूक इनामदार
९. मा. जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ. टिळक मुक्ता शैलेश
११. मा. सौ. पठारे सुमन बाळासाहेब
१२. मा. सौ. ओसवाल दीपाली प्रमोद
१३. मा. श्रीमती. नेटके सुशिला (ओसवाल)
१४. मा. सौ. बाबर आरती साईनाथ
१५. मा. सौ. गलांडे सुनिता मारूती
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. सौ. रोहिणी चिमटे [illegible] | मा. | मा. [illegible] | मा. [illegible] |
| मा. [illegible] | मा. [illegible] | मा. [illegible] | मा. [illegible] |

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अति.महा.आयुक्त (ज)
३. मा. श्रीमती प्रेरणा देशभ्रतार,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.डॉ. प्रविण आष्टीकर,सह. व्यव. संचालक, पीएमपीएमएल
६. श्री. सुनिल पारखी, नगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.मुख्य समाज विकास अधिकारी
८. मा.अंबरिष गालिंदे,सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक)
९. मा.सुहास मापारी, उप आयुक्त(कआ. व क.सं.)
१०. मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष)
११. मा. मोरे दगा पितांबर, उपायुक्त (झोनिपु)
१२. मा. प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (सामान्य प्रशासन)
१४. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्य अधिकारी
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, उपायुक्त, स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, शहर अभियंता
१९. मा.राजेंद्र राऊत अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा.बबन दहिफळे, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.ॲड.थोरात, मुख्य विधी अधिकारी
२३. मा. , मुख्य सुरक्षाअधिकारी
२४. मा. अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक
२५. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२६. मा. टि.एस. धारूरकर, जनरल मॅनेजर ऑपरेशन
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
३१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
३२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४) व (वि.का. घनकचरा व्यव.)
३३. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३४. मा.प्रमोद निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ)
३५. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता(विद्युत)
३६. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३७. मा.ना.न.बारापात्रे, अधीक्षक अभियंता (पथ)
३८. मा.संदिप खांदवे, कार्यकारी अभियंता(भवन)
३९. मा.विजय कुलकर्णी,अधी. अभि.(पा.पु.प्रकल्प व सुअरेज ऑप.)
४०. मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा)
४१. मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा)
४२. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४३. मा.सुधाकर देशमुख, विशेष कार्याधिकारी (दक्षता)
४४. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४५. मा. माधव जगताप, उपायुक्त, अतिक्रमण व विशेष कार्या. भूसंपादन
४६. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४७. मा. गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी.
४८. मा. उमेश माळी, उप आयुक्त
४९. मा. बेलदार, अधि. अभि. मलनिस्सारण
५०.

# पुणे महानगरपालिका

## स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ५८, दिनांक २९/३/२०१६**

**सभा क्रमांक ८७, दिनांक २९/३/२०१६ चा वृत्तांत**

मा. अध्यक्ष – सभेला सुरूवात करण्यात यावी.

नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

मा. अविनाश बागवे– मा.आयुक्त साहेब आज गॅन्ट्रीचा अहवाल देणार होते.

मा.आयुक्त– पुढील आठवड्यामध्ये सादर करतो.

मा.अविनाश बागवे– ठीक आहे पुढील आठवड्यामध्ये नक्की द्या.

मा. राजेंद्र शिळीमकर– मा. अध्यक्ष शिक्षण मंडळाचा अधिकार काढण्याचा जो प्रस्ताव आहे, त्याची माहिती आज देणार होते. मा. मुख्यसभे मार्फत शासनाकडे मान्यतेसाठी पाठवू शकतो तर आमचा गेल्या महिन्यात दिलेला प्रस्ताव मान्य करावा. तसेच शिक्षण मंडळाने गणेवश खरेदी किंवा शालेय साहित्याबाबत जी टेंडर प्रक्रिया राबविली आहे. त्यामध्ये टेंडर मुदत संपायच्या अगोदरच मुदतवाढ दिली आहे. याची माहिती द्या व दुसरा विषय असा होता की, शिक्षण मंडळामध्ये गेल्या दोन वर्षामध्ये अनेक भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि त्यामध्ये काही मध्ये तथ्य आढळून आले तसेच काहींवर गुन्हेही दाखल झाले आहेत. अशा स्परूपाचे वारंवार होत असलेले भ्रष्टाचार आत्ता आपण लावलेले टेंडर त्यामध्ये ही भ्रष्टाचार झाला आहे. त्या टेंडर प्रक्रिये मध्ये तुम्ही एल १ एल २ यायची वाट न बघता तुम्ही अगोदर नमुने टेस्ट करता हे तर सीव्हीसीच्या गाईड लाईन त्यांचे एकदम विरोधात जाऊन काम करतोय. एल१ व एल२ आल्यानंतर त्यांचे नमुने जे मटेरियल पुरवठा करणार आहेत ते नमुने आपण तपासले पाहीजे आपण काय करतो जे जे ठेकेदार किंवा बिल्डर आले आहेत. त्यांचेकडून नमुने घेतो आणि तेच तपासणी करतो. त्यामध्ये भ्रष्टाचार होतो. ज्यांना टेंडर द्यायचे असते त्यांचेच नमुने पास केले जातात आणि ज्यांचे नमुने पास केले आहेत त्यांचे टेंडर ओपन केले जातात बाकीच्यांचे केले जात नाही. म्हणजे एल१ जरी असले तरी त्यांचे टेंडर त्या कारणास्तव ओपन केले जात नाही. त्यामुळे महापालिकेचे नुकसान होते. दुसरा विषय असा होता की, जे नमुने दिले जातात आणि प्रत्यक्षात वेगळा माल दिला जातो. त्यावेळेस आपल्याकडून परत तपासणी होत नाही. स्वेटर घोटाळा सुद्धा अशा पद्धतीने झाला आहे. त्यासाठी पहिल्यांदा टेंडर प्रक्रिया ओपन करावी, ती ओपन झाल्यानंतर एल१ असेल त्याला वर्क ऑर्डर दिल्यानंतर मटेरियल सप्लाय करेल त्या मालाची टेस्टींग केली पाहिजे.

मा. अविनाश बागवे– असे नाही करता येणार कारणी की, जी पद्धत आहे टेंडर प्रक्रिया करताना सर्वांच्या नमुन्यांची टेस्टींग करावी लागते, उद्या तसे नाही केल आणि तो जर कोर्टामध्ये गेला तर मग आपल्या अडचण होईल.

मा. राजेंद्र शिळीमकर– एल२, एल३ आलेतर त्याचे टेस्टिंग करायची गरज नाही. जो आपल्याला मटेरियल सप्लाय करणार आहे, त्याची टेस्टिंग केली पाहीजे. ज्यांना टेंडर द्यायचे नाही, मग त्यांचे सॅम्पल का टेस्ट करायचे.

मा. डॉ. सिद्धार्थ धेंडे – तुम्ही म्हणता त्या पद्धतीने एल१ ला टेंडर द्यावा हे जरी मान्य असल पण त्यांच्या मालाचा दर्जा हा निकृष्ट निघाला तर मग काय करणार?

मा. राजेंद्र शिळीमकर – त्याच्यावर कारवाई करायची. त्यांचे डिपॉझिट जप्त करायचे आणि ब्लॅक लिस्ट मध्ये टाकायच. संबंधीत ठेकेदाराला मोबदला द्यायचा नाही.

मा. सिद्धार्थ धेंडे – पण त्याच्या मध्ये वेळ असा जातो की, दुसरा एल१ आहे, त्याचे नमुने टेस्टिंग झालेले असेल मग ती वेळ वाचते.

मा. राजेंद्र शिळीमकर – मग एल१, एल२ आणि एल३ ची यांच्याही नमुन्याची टेस्टिंग करून घ्या. तसेच जो माल देणार आहे त्यामालाची पण टेस्टिंग करून घ्या.

मा. अध्यक्ष, स्थायी समिती – संबंधीत अधिकाऱ्याने सांगावे काय प्रक्रिया आहे.

मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष महोदय, आपण जे पात्र झालेले निवीदाधारक आहेत. समजा ६ किंवा ७ असतील सर्वांच्या नमुन्याची टेस्टिंग करतो.

मा. राजेंद्र शिळीमकर –पात्र म्हणजे कसे? तुम्ही कसे पात्र करता?

मा. बबन दहिफळे– निवीदे मधील जे पहिले पाकीट आहे, त्या कागदपत्रावरील पूर्तता आहे. त्यानुसार पात्र करतो.

मा. राजेंद्र शिळीमकर –साहेब त्यामध्येच खरा घोटाळा होतो, कागदपत्रांची पूर्तता झाली म्हणजे ते पात्र झाले का?

मा. मुक्ता टिळक– कागदपत्रांची पूर्तता केली म्हणून नमुने टेस्टिंग करायची काय गरज नाही.

मा. राजेंद्र शिळीमकर– तुम्ही एल१ चे नमुने टेस्टिंग करा. त्या लॅब देखील चुकीचे अहवाल पाठवितात, ज्यांचे नमुने ओके असतात त्यांना डिफॉल्टर ठरवितात. ज्यांना टेंडर द्यायचे त्यांचे नमुने पास करून पाठवितात. मग आपण त्यांचे टेंडर ओपन करतो. टेंडर प्रक्रिया राबविण्याची पद्धत देखील शिक्षण प्रमुखांना माहित नाही तरी आपण हे शिक्षण मंडळाकडे का देतो आहे? गेल्यावेळी मी जो प्रस्ताव दिला होता. त्याचा अभिप्राय दिला असेल तो आम्हाला मान्य करायचा आहे. सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा आहे. त्यांचे अधिकार काढून घ्यायचे आहेत.

मा. मुक्ता टिळक– तीस दिवसामध्ये स्वेटर देऊ असे सांगिते होते, परंतु अजूनही स्वेटर दिले नाही. परवा मी सविस्टर यादी घेतली त्यामध्ये अजून विद्यार्थ्यांना स्वेटर देणे बाकी आहे.

मा. राजेंद्र शिळीमकर – गेल्यावर्षी सुद्धा साहेब गणवेश खरेदीमध्ये रेट कॉन्ट्रॅक्ट १९९४ चे दाखवून खरेदी केली आहे. तत्कालीन अति.महा.आयुक्त(वि) बकोरियासाहेब त्या घोटाळ्याची चौकशी करून अहवाल देणार होते. तो अहवाल अजून आला नाही तोच दुसरा घोटाळा चालू झाला आहे. हे असले घोटाळे थांबविण्याची गरज आहे. शिक्षणा सारख्या क्षेत्रात घोटाळे होत आहे हे आपण गांर्भीयाने बघतले पाहिजे.

मा. अध्यक्ष स्थायी समिती– मा. शिळीमकर आपणच बोलत आहात, अधिकाऱ्यांचा देखील खुलासा एकून घ्या.

मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष १ ली, ३ री, ५ वी आणि ७ वी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर दिलेले आहेत. २ री, ४ थी आणि ७ वी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर देणे बाकी आहेत. सर्व विद्यार्थ्यांना स्वेटर देणेसाठी बजेट अपूर पडल आहे.

मा.अध्यक्ष स्थायी समिती – अपूरे बजेट असेल तर निवीदा काढायची नव्हती. व्यवस्थित खुलासा करा.

मा. राजेंद्र शिळीमकर–मा. अध्यक्ष, शिक्षण प्रमुख असतील किंवा शिक्षण मंडळ असेल ही प्रणाली राबविण्यासाठी ते सक्षम नाहीत.

मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष स्वेटर हे आपण दोन वर्षातून एकदा देतो. आता १ ली, ३ री, ५ वी आणि ७ वी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर दिलेले आहेत. आणि आता २ री, ४ थी आणि ७ वी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर देणार आहे. म्हणजे आपोआस सर्व विद्यार्थ्यांना दर दोन वर्षातून स्वेटर मिळातात.

मा. मुक्ता टिळक–. मा. मुख्यसभेने असे सूचविले होते की, स्वेटर हे दोन वर्ष वापरता येतो म्हणून त्याप्रमाणे नियोजन करा. त्यानुसार. १ ली, ३ री, ५ वी आणि ७ वी आणि नंतर २ री, ४ थी आणि ७ वी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर देणे हे असे नियोजन केले आहे. मूळ मुद्दा याच्यामध्ये बाजूला असा राहतो की, ज्या विद्यार्थ्यांना स्वेटर द्यायचे त्या विद्यार्थ्यांना वेळेमध्ये स्वेटर दिले जात नाहीत. हे का दिले जात नाहीत आणि त्याचा दर्जा का तपासला जात नाही हा मूळ मुद्दा आहे. त्या मुद्दाचा खुलासा करा.

मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष ही निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्वेटर वाटप केला जातो. या वर्षी त्यांना एका महिन्याची मुदत दिली जाते. त्यांना वेळेत स्वेटर वाटप झालेली आहेत.

मा. मुक्ता टिळक–. स्वेटर वाटपाची यादी माझे कडे आहे अजून काही विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करणे बाकी आहे. मग स्वेटर वाटप झाले का म्हणता?

मा. बबन दहिफळे–ज्या इयत्ता मधील विद्यार्थ्यांना दिले आहेत. त्यांची मिळाल्याची पोहोच आल्यानंतर राहीलेल्या काही शिल्लक विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात येईल.

मा. मुक्ता टिळक– दहिफळे साहेब तुम्ही अर्धवट माहिती देताय.

मा. बबन दहिफळे– याबाबतची संपूर्ण माहिती घेऊन पुढील बैठकीमध्ये देतो.

मा. मुक्ता टिळक– नाही ही बैठक संपण्याआधी संपूर्ण माहिती घेऊन किती स्वेटर शिल्लक आहेत याची माहिती द्यावी.

मा. बबन दहिफळे– ठिक आहे.

मा. राजेंद्र शिळीमकर– लॅब ने जे नमुने पास केलेत त्याच दर्जाचे स्वेटर पुरविले आहेत का?

मा. बबन दहिफळे– पुरवठा केल्यानंतर देखील आम्ही तपासणी केली आहे, त्याप्रमाणे ज्या दर्जाचे नमुने पास केलेत त्याच दर्जाचे स्वेटर पुरविले आहेत.

मा. राजेंद्र शिळीमकर– तुम्ही आत्ताजी निवीदा प्रक्रिया राबविली आहे. त्याच काय करणार. पहिली लॅब टॅस्टिंग करणार का? अगोदर एल१ करणार?

मा. मुक्ता टिळक– याचा अहवाल स्थायी समितीपुढे आणणार आहे का?

मा. बबन दहिफळे–याबाबत मनपाची कोठी, दक्षता विभाग याचे मार्गदर्शन घेतो.

मा. फारूक इनामदार– तुम्ही सविस्तर माहिती घेऊन पुढील बैठकीमध्ये संपूर्ण माहिती द्यावी. कारण बऱ्याच शाळांमध्ये स्वेटर पोहचले नाहीत.
मा. बबन दहिफळे– ठिक आहे.
मा. सौ. अश्विनी कदम– मा. अध्यक्ष जर स्वेटरच्या बाबतीत लेखी अहवाल येणार असेल तर त्या वेळी आम्ही या ठिकाणी सूचना केल्या होत्या की, ज्या निवीदा ओपन केलेल्या त्यांचे नमुने लॅब टेंस्टिंगला पाठवा, त्याची लेखी अहवालामध्ये नोंद असणे आवश्यक आहे. त्यावेळी असा निर्णय का घेतला गेला अशी सर्व माहिती त्या अहवालामध्ये मुद्दे यावेत.
मा. बबन दहिफळे– मा. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे सर्व माहिती पुढील बैठकीस अहवालासह सादर करतो.
मा. राजेंद्र शिळीमकर – निवीदा प्रक्रिया राबविण्यासाठी शिक्षण मंडळाकडे आवश्यक तेवढे सेवक आहेत का त्याची माहिती द्या? निवीदा प्रक्रिया ही शिक्षकांमार्फत राबवतात.
मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष महोदय, सदरची बाब ही खरी नसून निवीदा प्रक्रिया राबविण्यासाठी अधिकृत सेवकांची नेमणूक  केली आहे. तसेच भांडार प्रमुख, सहाय्यक भांडारप्रमुख, अधिक्षक आणि आवश्यक तेवढे सेवक नाहीत त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे.
मा. राजेंद्र शिळीमकर –मा. अध्यक्ष शिक्षण प्रमुख सांगत आहेत की, आवश्यक तेवढा स्टाफ नाही. मग यांचेकडे निवीदा प्रक्रिया देऊ न देता, कोठी विभागाकडे द्या.
मा. अविनाश बागवे– दहिफळे साहेब आवश्यक सेवकांची लवकरात लवकर भरती करून घ्या.
मा. सौ. अश्विनी कदम– मा. अध्यक्ष, शिक्षण मंडळाकडे आवश्यक तेवढा स्टाफ नसेल तर शिक्षण प्रमुखांनी त्याची मागणी केली का? ही जी परिस्थिती प्रशासना समोर असताना त्यांनी मागणी केली का आणि जर मागणी केली असेलतर त्याची अंमलबजावणी का नाही झाली? याचा खुलासा करा.
मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष मागणी केली आहे. किमान २० लिपीक, सहा.भांडार प्रमुख, भांडार प्रमुख यांची पदे भरून मिळावी अशी लेखी मागणी केली आहे.
मा. राजेंद्र शिळीमकर–मा. अध्यक्ष जो पर्यंत यांनी आवश्यक तो स्टाफ मिळत नाही. तो पर्यंत सर्व कामकाज कोठी विभागाला द्या.
मा.अविनाश बागवे– मा. अध्यक्ष गेली दिड ते दोन वर्षे शिक्षण मंडळाचे निवीदा प्रक्रिया ही महापालिकेकडे होती, त्या वेळेस देखील शालेय साहित्य, गणवेश यांची चर्चा होत असत. चूक होत असेल तर १०० टक्के कारवाई करा.
मा.राजेंद्र शिळीमकर – ज्या वेळे आपण शिक्षण मंडळाला अधिकार दिल्या त्यावेळेस त्यांनी १ ते ३२ ऐटंमची मान्यता घेतली. त्यात दोन रेट कॉन्ट्रक्टची फसवी मान्यता घेतली. शिक्षण प्रमुख पत्र देणार आहेत. तुमची निवीदा प्रक्रिया थांबवा आणि त्यात अटी व शर्ती टाकून नवीन निवीदा प्रक्रिया राबवा.
मा. अध्यक्ष, स्थायी समिती – पुढील बैठकीमध्ये अहवाल सादर करणार आहेत. त्यावेळे सविस्तर चर्चा करून निर्णय घेऊ.
नगरसचिव– दाखल विषय घेण्यात येत आहे.
मा.सौ.अश्विनी कदम– दाखल विषय घेण्यापूर्वी मला अग्निशामक विभागाकडून माहिती हवी आहे. सहकारनगर पोलीस स्टेशन समोर आग लागली त्याचा तुम्हाला कॉल कधी आला आणि तुमच्या गाड्या किती वाजता पोहचल्या याची माहिती द्या?
मा.प्रशांत रणपिसे, अग्निशामक प्रमुख – ११.५२ मिनीटाने सहकारनगर पोलीस स्टेशन जवळील वाहनांना आग लागली होती. त्याच वेळेला अग्निशामक दलाचे वाहन त्या ठिकाणी पाठविले होते.
मा.सौ. अश्विनी कदम– गाडी उशीरा का पोहचली?
मा. प्रशांत रणपिसे, अग्निशामक प्रमुख– गाडी उशीरा नाही पोहचली. १२.०५ वाजता गाडी घटनास्थळी पोहचली. भवानी पेठेतून त्याठिकाणी जायला १३ मिनीटे लागली.
मा.सौ.अश्विनी कदम– ठिक आहे.
नगरसचिव– मा. अध्यक्ष यांनी दाखल विषय घेण्याच्या सूचना दिल्याप्रमाणे दाखल विषय घेत आहे.

<u>**दाखल विषय**</u>

**विषय क्रमांक :– २६२५/ठराव क्र २६२९**

बाणेर पाषाण लिंक रोडवर डिव्हायडर बसविणे, फुटपाथ विकसित करणे, रस्ता विकसित करणे (भाग १) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,२९,३८५/– पेक्षा १८.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८१,०२,३७८=१६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा

करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३०९ दि.२३/३/२०१६ चे पत्र.

मा.अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**दाखल विषय क्रमांक :– २६२६/ठराव क्र.२६३०**

प्रभाग क्र. ४४ ससाणेनगर रस्ता ते डि मार्ट समोरील रस्ता टी.डब्लू.टी. पध्दतीने कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९११/– पेक्षा २५.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,७९,९३३=४२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१० दि.२३/३/२०१६ चे पत्र.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. मुक्ता टिळक– मा. महापालिका आयुक्त युटीडब्ल्युटीने रस्ता कॉंक्रिटकरणेसाठी पुढील दोन महिने काय नियोजन करणार आहात.

मा.आयुक्त– अध्यक्ष महोदय, काल आम्ही याबाबत चर्चा केली असून आत्ता पर्यंत अंतिम निर्णय अजून घेतला नाही. मला अस वाटतय की काही कालावधीसाठी आपल्याला कॉंक्रिटीकरणाचे काम थांबवावे लागेल कारण ज्यापद्धतीने पाण्याची परिस्थिती आहे. आपल्याला समतोल निर्णय घ्यावा लागेल म्हणजे कामही चालू राहिल आणि पिण्याच्या पाण्याचा वापर होणार नाही. याबाबत एक ते दोन दिवसांत निर्णय घेणार आहे.

मा. डॉ.सिद्धार्थ धेंडे– मा. महापालिका आयुक्त म्हणतात ते बरोबर आहे, पिण्याचे पाणी तर अजिबात वापरायचे नाही.

मा.मुक्ता टिळक– पिण्याचे पाणी वापराबाबत आमचाही विरोध आहे. यासाठी आपण ग्रे–वॉटरचा वापर करू शकतो का?

मा.महापालिका आयुक्त– सिमेंटच्या रस्त्यासाठी ग्रे–वॉटरचा वापर करू शकत नाही.

मा. राजेंद्र शिळीमकर– बरोबर आहे, परंतु पुणे शहरामध्ये वापरायच्या पाण्याचा साठा भरपूर आहे. कात्रजच्या तलावातील असेल किंवा बोअरिंग असतील पुणे शहराला पिण्याचे पाणी सोडल तर वापरायच्या पाण्याची टंचाई अजिबात नाही.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– खदानी मध्ये भरपूर पाणी असते त्याचा वापरही होत नाही. ते पाणी वापरल पाहीजे. रस्ते कॉंक्रिटीकरणाचे काम थांबवू नका, युटीडब्ल्युटीने रस्ता कॉंक्रिट करणेसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्याचे निर्बंध घाला.

मा.महापालिका आयुक्त–पुणे शहरातील रस्ते युटीडब्ल्युटीने कॉंक्रिट करणेसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर न करता खदानी, बोअरींगचे, विहीरी किंवा पाण्याचा साठा आहे त्याचा वापर केला जाईल.

अशा अटी व शर्ती टाकून आदेश निर्गमीत करावा लागणार आहे. पिण्याच्या पाण्याचा वापर न करता कॉंक्रिटीकरण होत असेल तर काही हरकत नाही.

मा. राजेंद्र शिळीमकर– साहेब कामांच अस आहे की, जानेवारी व डिसेंबर मध्ये काढलेल्या टेंडरचे अजूनही वर्क ऑर्डर नाहीत. प्रशासनाकडे ४–४ महिने फाईल फिरत राहील्या तर कस काय आमच्या सारख्यांची काम होणार आमच्या भाजप सेनेकडे तर तुटपुंज बजेट असत. टेंडर मान्यतेला ४ महिने जातात आणि मार्च महिना आला की संपल बजेट. टेंडर ओपन झाल्यानंतर किमान एक महिन्याची मर्यादा घालून दिली पाहीजे. त्या महिना भरामध्ये वर्क ऑर्डरचे काम पूर्ण झाले पाहीजे.

मा. राजू पवार– मा. महपालिका आयुक्त मुदतवाढ होणार आहे का?

मा. महापालिका आयुक्त– याबाबत मागील बैठकीमध्ये देखील चर्चा झाली आहे. आपण एप्रिल महिन्या पर्यंत आलो आहे. एकंदरीत खर्च आणि आलेले उत्पन्न याचा हिशोब घेतो आणि मग त्याच्या नंतर मुदतवाढ किती आणि किती रक्कमेची हे आपण डिसाईड करतो. मागील वर्षी सुद्धा एप्रिलच्या तीसऱ्या आठवड्यात बसून केल होते. सर्वांना विश्वासात घेऊन १५ एप्रिल पर्यंत हा निर्णय घेता येईल. ३१ मार्च पर्यंत डिएसआर सर्वांना मिळेल अशी कार्यवाही होईल.

मा. राजेंद्र शिळीमकर– मा. महापालिका आयुक्त आता बजेट मिळणार की नाही अशा अनुषंगाने प्रशासन काय करत १५–२० दिवस कामे थांबवितात नंतर आपला निर्णय होण्यासाठी १५ एप्रिल जातो. एक महिन्यात स्टॉप झालेली कामे पुन्हा महिना वाढवून दिल्यानंतर प्रशासनाला ती कामे करणे होत नाही. त्यामुळे मुदतवाढ देऊन देखील काही उपयोग होत नाही.

**विषय क्रमांक :- २६२७/ठराव क्र २६३१**

प्रभाग क्र. ६ बोपोडी येथील नेत्र रुग्णालयामध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार आर.आर.धोत्रे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९४,७६,२५६/- पेक्षा २५.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७०,१३,३७७=०६ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३१२ दि.२३/३/२०१६ चे पत्र.

मा. राजू पवार- हा विषय मान्य करावा.

**निर्णय - सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :- २६२८/ठराव क्र २६३२**

Rehabilitation and Repairing of work of old Bridges in Pune Municipal Corporation over Mutha River कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराईज अर्थ मुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,५२,१८,६११=५३ पेक्षा १५.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,५२,४०,१६३=९६ पर्यंत काम करून घेणेस अधिक बाजारभाववाढ सुत्रानुसार तसेच सिमेंट, लोखंड, डांबर या मटेरियलचे निर्धारित केलेले बेसिक दरातील प्रत्यक्ष फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१३१४ दि.२८/३/२०३१६ चे पत्र.

मा. अविनाश बागवे- कोणते कोणते ब्रिज आहेत?

मा.बोनाला, अति.नगर अभि.(वाहतूक)- नदीवरचा नवा पूल म्हणजे शिवाजी ब्रिज, संभाजी ब्रिज, व्हेलेस्ली ब्रिज, म्हात्रे ब्रिज या पुलांच्या दुरूस्तीच्या कामाचे टेंडर काढले होते. मागील वर्षी १० कोटीचे तरतूद होती. डेंगळे पुलाचे काम सुरू केले आहे, ते वेगळे कॉन्ट्रॅक्ट आहे. आता जे टेंडर काढले आहे, ते पुलाच्या दुरूस्तीच्या कामाचे कन्सल्ट नेमणूक करून टेंडर काढणेसाठी कालावधी लागले. प्रतिसाद चांगला नाही मिळाला. कारण दोन वेळा एक्सटेंड केल होत. जे ऐजन्सी लॉएस्ट आले त्या ऐजन्सीची शिफारस केली आहे.

मा.अविनाश बागवे- कन्सल्टंट कोण आहे?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक)-पूर्वी सी.व्ही.कन्ट कन्सल्टंट दोन वर्षात ब्लॅक लिस्ट केले होते आणि त्यांची मुदत देखील संपलेली होती. गेल्या आठवड्यात सी.ओ.ए.पी चे बिराजदार आहेत. आम्ही त्यांना विनंती केली होती. त्यानुसार ते काम करायला तयार आहेत. त्यानुसार सी.ओ.ए.पी.चे वेगळे डॉकेट आपल्याकडे आणणार आहे. दीड वर्षापूर्वी सी.व्ही.कंन्ट यांनी एकूण १८ पूलांचा अहवाल सादर केला होता पथ विभागाकडे आणि त्या पैकी एक पुलाचे टेंडर काढले होते काम देखील चालू केल आहे. तसेच १७ पैकी ५ पुलांचे टेंडर काढले आहे. त्याची देखरेख कॉलेज ऑफ इंजनिअरिंगचे प्रोफेसर बिराजदार हे करणार आहेत.

मा.अविनाश बागवे- ब्युटीफिकेशन करणार आहे की, सिंथेनिंग करणार आहे?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक)-सिंटेथिंग करणार आहे. माझी विनंती आहे की, डेंगळे पुलाचे काम चालू आहे पहायचे असेल तर त्यांची पाहणी करू.

मा. अविनाश बागवे- पाहणीचे तारीख आणि वेळ आपणस निश्चित करा सर्वजण जाऊ.

मा.सौ.अश्विनी कदम- तुम्ही हे दुरूस्तीचे टेंडर काढले आहे. सदरचे काम किती दिवसांत पूर्ण करणार आहात?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक)-९ महिने लागणार आहेत. तसेच पुढील वर्षाच्या बजेटमध्ये देखील तरतूद करण्यात आली आहे. डेंगळे पूलाचे जवळपास तीन कोटीचे कामकाज झाले आहे. पूलाच्या दुरूस्तीचे काम के स्पेशलाईज काम आहे, वेळ जातो तसेच एजन्सी मिळत नाही. वेळोवेळी जाहिरात देऊन देखील प्रतिसाद मिळत नाही.

मा.सौ.अश्विनी कदम- याच्या अगोदर वर्षभर तुम्ही पूलांच्या दुरूस्तीची कामे का केली नाहीत, कामात दिरंगाई वाटते. सदर पूलांवरून हजारो वाहने ये-जा करत असतात, पूलांचे काम व्यवस्थित होणे गरजेचे आहे.

मा. अध्यक्ष - हा विषय मान्य करावा.

**निर्णय - सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :- २६२९/ठराव क्र २६३३**

प्रभाग क्र. ४४ डि मार्ट जवळील ग्लायडींग सेंटर बाजुचा रस्ता टी.डब्लू.टी. पध्दतीने कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९८,६८७/- पेक्षा २६.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७३,९६,०२८=७७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा

करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१५ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा.अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३०/ ठराव क्र २६३४**

प्रभाग क्र. २१ ब मध्ये फुटपाथ व विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.ॲण्ड जे.बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,९९,९५४/– पेक्षा २१.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,८०,५६४=११ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१६ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३१/ ठराव क्र २६३५**

प्रभाग क्र. ४४ काळे बोराटे नगरकडे जाणारा रस्ता कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.काकडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,९९,५२६/– पेक्षा २३.५७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६८,७८,३३७=७२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१७ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३२/ ठराव क्र २६३६**

फुलेनगर, येरवडा, राम सोसायटी मध्ये विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स कंपनी यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.४९,९९,९९९=६० पेक्षा ३.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,१५,४९९=६१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१८ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. सुनिल गोगले– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३३/ ठराव क्र २६३७**

प्रभाग क्र. २१ अ मध्ये फुटपाथ व विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.ॲण्ड जे.बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६४,९९,९७३/– पेक्षा २१.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५०,७०,६२८=९३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३१९ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३४/ ठराव क्र २६३८**

प्रभाग क्र. ५६ मध्ये गोल्डन व्हिल हॉटेल ते आनंद मठ दुचाकी पुल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिंदे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,३६,८७२/– पेक्षा १२.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,३६,०२६=१२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३२० दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. चंद्रकांत कदम– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३५/ ठराव क्र २६३९**

पुणे महानगरपालिकेकडून शासनास दि. २१/३/२०१६ रोजी रक्कम रुपये ३,८८,९६,०००/– अदा करण्यात आलेले आहेत. तरी शासनाकडील मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जागेचे येणारे मुल्यांकनानुसार देय असलेली उर्वरित फरकाची रक्कम रुपये

६८,६४,०००/– शासनास अदा करणेसाठी भूसंपादन व व्यवस्थापन विभागाकडील जमिन संपादनाबाबतचे उपलब्ध अर्थ संकल्पिय तरतुदीमधून खर्ची टाकणेस व सदरची रक्कम शासनाकडे अदा करुन वाघोली गट क्र. ११२३ पैकी ८००० चौ.मी. जागा बी.आर.टी.बस टर्मिनलसाठी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/१३२३ दि. २८/३/२०१६ चे पत्र.

मा. मुक्ता टिळक– या अगोदर आलेला विषय आणि या विषयामध्ये काय फरक आहे?

मा.आयुक्त– मा. अध्यक्ष महोदय, हा विषय झाला होता, पूर्वी जी डिमांन्ड नोट दिली होती. त्याप्रमाणे आपण पैसेही भरले. पण या मधल्या कालावधीमध्ये कॅलक्युलेशनची जी पद्धत आहे. त्यामध्ये बदल झाल्यामुळे ६० लाखांनी त्याची किंमत वाढली आहे. मा. मा. जिल्हाधिकारी यांचेकडून असे केल होत जी पूर्वी आपण पैसे भरले त्याच्यानुसार ताबा घेण्याची कार्यवाही केली आणि पुढचे पैसे त्यांचे राहिलेले ते आता आपण भरतो आहे.

मा.अविनाश बागवे– आपले कॅलक्युलेशन चुकल का त्यांचे कॅलक्युलेशन चुकल?

मा.आयुक्त– आपले कॅलक्युलेशन नाही चुकल, त्यांनी कॅलक्युलेशनची पद्धत बदलली आहे. त्यामुळे हा फरक आला. त्यांनी सूचविलेली रक्कम आपण भरली असून फरकाची रक्कम भरायची आहे.

नगरसचिव– मा. कुलकर्णीसाहेब या विषयपत्रामध्ये टायपिंग मिस्टेक आहे, तेवढी दुरूस्त करून द्यावी.

मा. अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३६/२६४०**

पुणे महानगरपालिका प्रशासनास उरूळी देवाची व फुरसुंगी येथील कचरा डेपो येथे कचरा / रिजेक्ट्स टाकण्यासाठी येत असलेली अडचण,महापालिकेच्या धोरणास तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी मे. राज्य/केंद्र शासनाची मान्यता मिळणेसाठी लागणारा कालावधी, ग्रामस्थांची मागणी, भविष्यातील कचऱ्याची गंभीर समस्या व आरोग्य विघातक परिस्थिती, इत्यादी बाबी विचारात घेऊन मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील नमुद केलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार नेमुन दिलेल्या क्षेत्रिय कार्यालयाकडे हजर होतील व समाधानकारक रितीने काम करतील त्या उमेदवारांना एकवट मानधन र.रू.१०,७८१/– वर कराराने सहा महिने मुदतीसाठी बिगारी या पदावर विविध क्षेत्रिय कार्यालयांकडे नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्य/१३२४ दि. २८/३/२०१६ चे पत्र.

मा. अविनाश बागवे– विषय मान्य करा. या अगोदर माहिती घेतली होती, परत थोडी माहिती देण्यात यावी. अगोदर घेतलेल्या लोकांना मुदतवाढ देतोय? का नवीन लोक वाढवतोय?

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– ही लोक खरच काम करतात की नुसते हजेरी लावायला येतात. मस्त पैकी बीएमडब्लु गाडीमध्ये येतात आणि हजेरी लावून चहा पितात गप्पा मारतात आणि जातात माझ्याकडे पुरावा आहे. हे जे सेवक आहेत त्यांची बायोमॅट्रिक हजेरी करा. किती वाजता येतात? किती वाजता जातात? त्याची देखरेख करा.

मा. मुक्ता टिळक– त्यांना काम काय दिलेल आहे?

मा. राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(ज)– पुणे महानगरपालिकेकडे ज्यावेळेस सदर जागा कचरा डेपोसाठी लागत होती. त्यावेळी प्रोजेक्ट बाधीत जमीन मालकांच्या वारसांना पुणे मनपाच्या सेवेत समावेश केला जाईल अशी मा.मुख्यसभेने मान्यता दिली होती. त्यानुसार यादी तयार करून मागील दोन वर्षापासून मे.महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. दरम्यानच्या काळात वेळोवेळी आंदोलन झाल्यानंतर बाधीत जमीन मालकांच्या वारसांना सद्या ६–६ महिने बिगारी व शिपाई याच पदावर मानधनावर सेवेत घेत आहोत. महाराष्ट्र शासनाकडे प्रोजेक्टचा दर्जा देणेस तयार आहेत. याबाबत संबंधीत विभागाने वेळोवेळी पाठपुरावा केला असून १०० एकर पेक्षा जास्त जमीन प्रकल्पग्रस्तामध्ये जात असेल तर बाधीत जमीन मालकांच्या वारसांना नोकरी देणेबाबत धोरण निश्चित करण्यात येत आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर मनपाकडे पदेनिर्मिती झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रातील प्रोजेक्ट बाधीत जमीन मालकांच्या वारसांना कायम स्वरूपी नोकरी समावेश केला जाईल.

मा. फारूक इनामदार– बाधीत म्हणजे काय त्यांच्या जमीनी आपण संपादीत केली आहे का?

मा. राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(ज)– हो त्यांच्या जमीनी महापालिकेने संपादीत केल्या आहेत.

मा. अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३७/ ठराव क्र २६४१**

कोथरुड व वारजे कर्वेनगर येथील मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर बसविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु इंडिया कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,५००/– पेक्षा १८.०९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८१,९०,५९०=४५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ

सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३२५ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३८/ ठराव क्र २६४२**

प्रभाग क्र. ११ ब मध्ये साध्वी सावित्रीबाई फुले सांस्कृतिक सभागृह येथील विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.आर.पी.चित्रोडा, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,९९,९२३=९० पेक्षा २४.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,००,००२=९२ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सूत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३२६ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा.अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६३९/ ठराव क्र २६४३**

बाणेर स्मशानभुमी अलोमा काऊंटी एस.टी.पी.प्लान्ट परिसरात नव्याने प्रकाश व्यवस्था करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मनुश्री इलेक्ट्रिकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,९९,६१६/– पेक्षा २.८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,७३,६२६=७५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३२७ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४०/ ठराव क्र २६४४**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मंगळवार पेठ पुणे येथील देखभाल दुरुस्ती/नुतनीकरण कामे करणे (सिव्हील वर्क) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,२५,५७१/– पेक्षा २१.९२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३,२९,४०५=८३ रकमेपर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३२८ दि.२८/३/२०१६ चे पत्र.

मा. अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४१/ ठराव क्र २६४५**

खराडी येथील ब्ल्युबेरी व डेक्कन गोल्ड येथील अर्धवट असलेली १२ मी. डी.पी.रस्ता ६० मी. डी.पी.रस्त्याला जोडणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमूव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,७६८/– पेक्षा २०.०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,३४,१०४=५२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३२९ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. सुनिल गोगले– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४२/ ठराव क्र २६४६**

प्रभाग क्र. ४ अ जेल वसाहत, श्रमिक वसाहत, कस्तुरबा सोसायटी मधील नाल्यांची व मलवाहिन्यांची हाय पॉवर सक्शन कम जेटिंग मशिनद्वारे साफसफाई करणे, ड्रेनेज लाईन टाकणे, राडारोड उचलणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३७,९९,६९७/– पेक्षा ५.००% कमी सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,०९,७१२=१५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१३३० दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. सुनिल गोगले– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४३/ठराव क्र २६४७**

प्रभाग क्र. ५ ब मध्ये जेटींग व सक्शन कम मशिनच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,४९,६६४/–पेक्षा ५.००% कमी सुधारित दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,०७,१८०=८० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१३३१ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४४/ ठराव क्र २६४८**

प्रभाग क्र. ५५ वडगांव सिंहगड रोड वडगांव फाटा ते अमर ज्योत मित्र मंडळ चौक ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मनोज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,९९,५०८/–पेक्षा २७.२८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,४४,८४२=२२ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१३३२ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४५/ ठराव क्र २६४९**

खराडी मधील गंगा कॉन्स्टेला येथील रस्त्याचे अर्धवट काम पूर्ण करणे व फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमूव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९५४/– पेक्षा २०.०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,३४,२५३=२२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३३३ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. सौ.सुनिता गलांडे – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४६/ ठराव क्र २६५०**

पुणे सातारा रस्ता धनकवडी येथे बांधण्यात येत असलेल्या नवीन उडड्डाण पुलावर आर्कीटेक्चरल इफेक्ट लायटिंग करणे हे काम ठेकेदार मे.सार्थक इलेक्ट्रोमेक प्रा.लि. यांचेकडून करुन घेणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र. २२६५ दि.३/२/२०१६ अन्वये र.रु.७१,७७,०००/– पर्यंत मान्यता मिळाली असल्याने व सदर कार्यादेश दिल्यानंतर अतिरिक्त तरतूद र.रुपये ३०,००,०००/– उपलब्ध झाली असल्याने सुधारित र.रु.७१,७७,०००/– अधिक र.रुपये ३०,००,०००/– अशी एकूण र.रुपये १,०१,७७,०००/– (र.रुपये एक कोटी एक लाख सत्याहत्तर रुपये फक्त) पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३३४ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा.राजेंद्र शिळीमकर– बोनाला साहेब हे लाइटींग वगैरे करण्यापेक्षा पाथ वे करा.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक)–मी दोन वेळा आपल्या समवेत सोसायटीचे अध्यक्ष यांना बोललो होतो, परंतु त्यांची इच्छा नाही.

मा.राजेंद्र शिळीमकर– आम्ही स्वतः त्यावेळी थांबतो, तुम्ही पाथ वे करा.

मा.बोनाला, अति.नगर अभि.(वाहतूक)–ठीक आहे.

मा.राजू पवार– विद्यापीठ चौकातील ब्रिजच्या खालचा राडारोडा का उचलला नाही?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक)–क्षेत्रिय आयुक्त यांचे नियंत्रणाखाली येत.

मा. सुनिल केसरी,उप आयुक्त(प.म.क्र.१)– लवकरात लवकर उचण्याची व्यवस्था करतो.

मा.राजू पवार– पूलाचे रंगरंगोटीचे काम येत ना तुमचे नियंत्रणाखाली ते तरी करा.

मा.बोनाला, अति.नगर अभि.(वाहतूक)–पूलाच्या रंगरंगोटीच्या कामाचे टेंडर काढले आहे. लवकरच पेंटींगचे काम पूर्ण होईल.

मा. राजेंद्र शिळीमकर – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४७/ ठराव क्र २६५१**

प्रभाग क्र. १७ ब मध्ये मुख्य रस्त्यावरील जुन्या व खोल ड्रेनेज लाईन मशीनने गाळ काढणेचे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,७६४/– पेक्षा ५% कमी दराने ठेकेदाराने स्वत:हून कमी करुन दिलेला दर) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,४९,७७५=८० होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१३३५ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४८/ ठराव क्र २६५२**

प्रभाग क्र. १६ अ मधील मुख्य रस्त्यावरील लुपरोड वरील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व मुख्य रस्त्यावरील जुन्या व खोल ड्रेनेज लाईन यांत्रिकी पध्दतीने साफ करणे व सेक्शन मशीनने गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,४९,८१५/– पेक्षा ५% कमी दराने ठेकेदाराने स्वत:हून कमी करुन दिलेला दर) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,०७,३२४=२५ होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१३३६ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. सुनिल गोगले– मान्य करा हा विषय. मा. महापालिका आयुक्त कित्येक ठिकाणी रस्ते खोदण्यासाठी पोलीस मनाई करतात याबाबत मा. मुख्यसभेमध्ये देखील चर्चा झाली. सातबारा हा महापालिकेचा, त्या रस्त्याचा मेंटेनेन्स व बाकीचे सगळे काम महापालिका करते एखादया रस्त्याचे काम चालू करायच त्या ठिकाणचे ट्राफिक नियंत्रण करा एवढच त्यांना कळवितो तेच त्यांचे काम असते. एनओसी वगैरे याची काय आवश्यकता नसते. ट्राफिक विभाग यांचे समवेत बैठक लावून सदरच्या विषयावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

मा.महापालिका आयुक्त– मा. मुख्यसभेमध्ये चर्चा झाल्यानंतर डिसीपी आणि सिपी साहेबांशी बोलण झालं आज त्यांची आपल्याकडे मिटींग आहे त्यानंतर योग्य निर्णय घेऊ.

मा. सुनिल गोगले– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६४९/ ठराव क्र २६५३**

हडपसर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभागामध्ये टँकरने पाणी पुरवठा करणे (भाग–ब) (२०१५–१६) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३३,८४,०००/– पेक्षा ०.४४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,६९,११०=४० पर्यंत काम करून घेण्यासाठी त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/लपापु/१३३७ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५०/ ठराव क्र २६५४**

प्रभाग क्र. ५३ ब राजीव गांधी वसाहत ते आनंदविहार २२ के.व्हि.एच.टी. खडकवासला लाईन अंडरग्राऊंड करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.स्क्वेअर इलेक्ट्रिकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६०,४२,२३१/– पेक्षा १९.७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,५१,९११=४९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३३८ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५१/ ठराव क्र २६५५**

गुंजन थिएटर समोरील मुस्लिम दफनभूमी येथील तळमजल्यावर पहिल्या मजला बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रशांत कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९४,८९८/– पेक्षा ११.८८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,२०,३०४=११ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३३९ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. सुनिल गोगले– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. सुनिल गोगले– मला एक विषय मांडायचा आहे. तो कसा आपण घ्याल. पुणे शहरामध्ये अनेक उद्यान आपण पाहतो. कित्येक वेळा स्मशान भूमीमध्ये अवस्था असते, त्या अवस्थेमध्ये थोडे बदल केले पाहीजे. दफन भूमीमध्ये आजही खूप विचित्र परिस्थिती आहे. त्याठिकाणी घाण पण खूप असते त्यामुळे वासही खूप येतो. मयत घेऊन गेल्यावर माणसाला कधी गाडायचे आणि कधी येथून पळून जाऊ असे होते. दफनभूमीध्ये झाड, फुलझाडे, फुलवेली लावली पाहिजेत.

**विषय क्रमांक :– २६५२/ ठराव क्र २६५६**

उरुळी देवाची/फुरंसुगी गावामध्ये विविध विकास कामे करणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये ३.५० कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१३४० दि.२९/३/२०१६ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५–२०१६ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, CE19A162, पुणे शहराच्या घनकचरासाठी ताब्यात येणाऱ्या जागांवर नव्याने शास्त्रीय पध्दतीने भुभराव विकसित करणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे | ३.५० कोटी | --- |
| **नविन सुचविलेले काम**<br>सन २०१५–२०१६ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, CE19A139, उरुळी देवाची /फुरंसुगी गावामध्ये विविध विकास कामे करणे | --- | ३.५० कोटी |

मा. अविनाश बागवे– आता कस काय आल इतक उशीरा हे वर्गीकरण यांची माहिती द्या.

मा. सुनिल गोगले– या विषयाची माहिती द्या.

मा. नितीन केंजळे (कामगार कल्याण अधिकारी) (कामगार कल्याण अधिकारी)–उपरोक्त काम केलीत ही वस्तुस्थिती आहे. पुढच्या वर्षी तरतूद कमी असल्याने उपरोक्त कामांसाठी वर्गीकरण करायचे आहे.

मा. अविनाश बागवे– कोणत्या कामांसाठी वाचून दाखवा.

मा.नितीन केंजळे (कामगार कल्याण अधिकारी) (कामगार कल्याण अधिकारी)– फुरसुंगी फाटा उड्डाण पुल येथे ड्रेनेज लाईन टाकणे, धमालवाडी परिसरात रस्ते कॉंक्रीट करणे, पापडीवस्ती परिसरात रस्ता कॉंक्रिट करणे, भेकराईनगर परमार परिसर येथील विविध गल्ली बोळ कॉंक्रिट करणे, गणेश नगर परिसरात कॉंक्रिट करणे, तुकाई दर्शन–भेकराईनगर परिसरात रस्ते कॉंक्रिट करणे, गंगानगर येथील उर्वरित गल्ली बोळ व रस्ते कॉंक्रिट करणे, देवाची उरूळी जूना पालखी मार्ग डांबरीकरण करणे, देवाची उरूळी लेंडीचा ओढा व परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व मे.इन्फिनीटी इंजिनिअरींग यांचे बील अदा करणे.

मा. अविनाश बागवे– ही कामे केली आहेत का करायची आहेत?

मा.नितीन केंजळे (कामगार कल्याण अधिकारी)– ही कामे केली आहेत.

मा. अविनाश बागवे– कोणत्या बजेट मधून कशी केली? तुमचे कडे तरतूद नाही तर टेंडरींग कस लावल. आणि ते विषयपत्रात पाणी पुरवठा च्या कामांसाठी बजेट लागणार आहे असा उल्लेख आहे. मग कॉंक्रिट किंवा इतर कामे कशी काय आलेत?

मा. सुनिल गोगले– मा. अध्यक्ष हा विषय पुढे जाऊ द्या नंतर माहिती घेऊन विषय मान्य करू.

मा. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त(परिमंडळ कार्या.) – मा. अध्यक्ष खात्याकडून फुरसुंगी भागात जे काम करतो ती यादी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपल्याकडे येते. आपण ती मान्य करतो आणि चालू वर्षी त्याला १० कोटी इतकी तरतूद होती. ९.४४ कोटी आता पर्यंत खर्ची पडलेली आहे. एकूण १४ कोटी इतकी तरतूद अपेक्षित आहे. आता खात्याकडे उपलब्ध ३.५० कोटी आता सूचविली आहे. ही मान्य केली तर खर्ची पडेल कारण पुढील वर्षी याला कमी तरतूद आलेली आहे.

मा. राजेंद्र शिळीमकर– काम केलेल आहे का?

मा. ज्ञानेश्वर मोळक,उप आयुक्त(परिमंडळ कार्या.)– मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या कामांची यादी आलेली आहे.

मा. सौ. अश्विनी कदम– मा. अध्यक्ष, कलेक्टरकडून आलेली यादी संपणार की नाही? पुढील वर्षी तरतूद कमी पडणार आहे म्हणजे आहेत किती कामे?

मा. अविनाश बागवे– वर्षभर जर पाहील तर सर्वात जास्त वर्गीकरण हे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे आहेत. एकीकडे बजेट उपलब्ध करतो आणि वर्गीकरण कोणते केलेत प्रभागनिहाय कचराव्यवस्थापन करणेचे बजेट चे वर्गीकरण केले आहेत.

मा. ज्ञानेश्वर मोळक,उप आयुक्त(परिमंडळ कार्या.)– मा. अध्यक्ष महोदय, आपण काम सूचवित नाही. ग्रामपंचायत ठराव करून मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठवितात आणि मा. जिल्हाधिकारी त्या कामांची यादी आपल्याकडे पाठवितात. त्याप्रमाणे काम करतो.
मा. अविनाश बागवे– मग तुमच्या विषयपत्रामध्ये तस यायला पाहीजे होत. त्या ठिकाणी विविध कामे पाणी पुरवठाची करण्याच्या कामाच.
मा. ज्ञानेश्वर मोळक,उप आयुक्त(परिमंडळ कार्या.)– हो तस विषयपत्रामध्ये येणे आवश्यक होते. परंतु माझी विनंती आहे की, सदरचे वर्गीकरण मान्य करावे.
मा. मुक्ता टिळक– अशी माहिती द्या की समजा मा. जिल्हाधिकारी आपल्याला माहिती देतात ती नवीन वर्ष सुरू होताना देतात का? कारण त्यांनी यादी अगोदर दिली तर बजेट मध्ये तरतूद होईल अन्यथा प्रत्येक काम हे आपल्याला वर्गीकरणाव्दारे करावे लागेल. आपण सन २०१६–१७ मध्ये तरतूद केली आहे का? मग तेच वर्गीकरण करणार का?
मा. ज्ञानेश्वर मोळक,उप आयुक्त(परिमंडळ कार्या.)– ४.२० कोटी इतकी तरतूद केली आहे. नाही ते वर्गीकरण करणार नाही.
मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५३/ठराव क्र २६५७**

स.नं. ४५ धानोरी येथील साठे बिस्कीट कंपनी समोरील ३० मी.रुंदी डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.पव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,६१,३५८/– पेक्षा ५.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,६९,२५२=६३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३४१ दि.२९/३/२०१६ चे पत्र.
मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५४/ठराव क्र २६५८**

प्रभाग क्र. ४५ ब मौजे महंमदवाडी वाडकर मळा ओढया लगत पुल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.चंद्राई कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,६५,०३२/– पेक्षा २०.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,५०,६७०=३७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३४२ दि.२९/३/२०१६ चे पत्र.
मा. फारूक इनामदार– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५५/ठराव क्र २६५९**

प्रभाग क्र. २ मध्ये विविध ठिकाणी एल.ई.डी.लाईट फिटींग करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एम.एस.इलेक्ट्रीकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,४८,९८२/– पेक्षा ४२.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,०६,९२०=२१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३४३ दि.२९/३/२०१६ चे पत्र.
मा. मुक्ता टिळक– ते टेंडर कितीने बिलो आहे?
नगरसचिव– ४२.९९
मा. मुक्ता टिळक– याची थोडीशी माहिती द्या इतकी बिलो कस काय म्हणजे ५० टक्के रक्कम बिलो कशी येऊ शकते.
मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता तांत्रिक– या वर्षी एलईडीचे काही दर आहेत. बऱ्याच प्रमाणात स्पर्धेमुळे उतरलेले आहेत. त्याच्यामुळे हा वर्षभर ३०–३५ टक्यावरून ४२ टक्कयावर आला आहे. यावर्षी नव्याने दरपत्रक करण्यात येईल. त्यामध्ये सदर बाबींचा विचार करून दरपत्रक करण्यात येईल.
मा. सुनिल गोगले– मग तो बँक गॅरन्टी आली मग तो विषय होत नाही पुढे त्यांना वर्क ऑर्डर मिळत नाही.
मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता तांत्रिक– बँक गॅरन्टी आपण सर्वच प्रकरणांना घेत आहे.

मा. सुनिल गोगले– १५ टक्के नंतर बरोबर आहे मग एवढे बिलो गेल्यानंतर तुमचा डीएसआर तुमचा काय म्हणतो, कसे काय? त्यांच्याकडून कामे करून घेता हा मोठा प्रश्न आहे. एखादा ठेकेदार एक कोटीचे काम द्या त्याची एनओसी आणत नाही. तो पर्यंत त्याला पुढची कामे देऊ नका अस काहीतरी करा

मा. अविनाश बागवे– हा विषय मान्य करा सभासद बोलतात ती वस्तुस्थिती आहे. गेल्या वर्षी आपल्या दोन डीएसआर मध्ये खूप मोठ्या प्रमाणात चूका झाल्या होत्या एक डांबरीकरण आणि विद्युतच्या कामामध्ये, त्या चूकीमुळे ३० आणि ४० टक्के बिलो व्हायला चालू झालेत. या वर्षी ती दक्षता घेऊन डीएसआर करा. म्हणजे हा सभ्रम राहणार नाही.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५६/ठराव क्र २६६०**

शिवाजीनगर भागातील प्रभाग क्र. १३ न.ता.वाडी पुणे ५ मधील मनपाच्या खाशाबा जाधव शाळेतील मैदान विविध खेळांसाठी तयार करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धूत सॅण्ड ॲण्ड स्टोन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,०१,९९,३१३=१४ पेक्षा २३.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८,१९,८१३=३८ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३४४ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष – हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५७/ठराव क्र २६६१**

प्रभाग क्र. १७ ब मध्ये क्रांतीवीर लहुजी वस्ताद शाळेत व सांस्कृतिक भवन येथे विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.द रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६६,२९,७४८/– पेक्षा १६.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५,५४,४०२=८७ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सूत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३४५ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

मा. अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५८/ठराव क्र २६६२**

प्रभाग क्र. २० अ मधील मुंढवा भाजी मार्केट येथे दुमजली इमारत व बहुउद्देशीय हॉलचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शांती कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५२,३६,६२४/– पेक्षा १९.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,९५,०५९=४८ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सूत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१३४७ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

माअविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :– २६५९/ठराव क्र २६६३**

मा.दत्ता बहिरट व मा.अनिल राणे यांचे दि.२९/३/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ११ ब मध्ये बिडी किल्लेदार मिनीमार्केट बांधणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक,<br>१)४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १७८, अ.क्र.१,निरनिराळ्या झोपडपट्टींमध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–४), पान क्र.२७३, अ.क्र.२३८, प्रभाग क्र.११ गोखलेनगर जनवाडी पठाणवस्ती स.नं.९७ येथील झोपडपट्टीत सिमाभिंत व इतर विकासाची कामे करणे.<br>२) ९.पथांची झाडलोट/घनकचरा व्यवस्थापन विभाग, पान क्र.१२०, अ.क्र.३८, प्रभाग | ५ लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| क्र.११ मधील मुता-या स्वच्छ करणेसाठी वॉटरप्रेशर व्हेईकल घेणे. (टाटा एसीई गाडी घेऊन मशिनरी बसविणे) | ४ लाख | --- |
| १०.ख. वाहतुक नियंत्रण, पान क्र. १२६, अ.क्र. २३, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे (यादी एस-३०), ३)पान क्र. २२९, अ.क्र. १३, प्रभाग क्र.११ ब गोखलेनगरमधील विविध ठिकाणी थर्मोप्लास्टीक पेंट व कॅट आईज लावणे. | ९ लाख | --- |
| ४) पान क्र.२२९ अ.क्र.१५ प्र.क्र.११ ब गोखले नगर मधील पी.एम.पी. एम.एल. चे बस स्टॉप विकसित करणे | ५ लाख | --- |
| ५) १२. भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १४०, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस-१६), पान क्र.२५२, अ.क्र.१४, प्रभाग क्र.११ ब गोखलेनगरमधील बाबा आमटे सांस्कृतिक सभागृहाची विकास कामे करणे | १५ लाख | --- |
| ६) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र.१४०, अ.क्र. १४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-२६), पान क्र.२४७, अ.क्र.१५, प्र.क्र.११ ब गोखले नगर मध्ये लोखंडी बाके बसविणे. | ५ लाख | --- |
| ७) ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १७८, अ.क्र. १, निरनिराळ्या झोपडपट्टींमध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस-४), पान क्र.२७३ अ.क्र.२३८, प्रभाग क्र.११ ब गोखले नगर जनवाडी पठाणवस्ती स.नं.९७ येथील झोपडपटटीत सिमाभिंत व इतर विकासाची कामे करणे | ५ लाख | --- |
| ८) पथांची झाडलोट/घनकचरा व्यवस्थापन विभाग पान क्र.१२०, अ.क्र३८, प्र.क्र.११ ब मधील मुता-या स्वच्छ करण्यासाठी वाटरप्रेशर व्हेईकल घेणे (टाटा एसीई गाडी घेऊन मशिनरी बसविणे) | २ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ११ ब मध्ये बिडी किल्लेदार मिनीमार्केट बांधणे | --- | ५० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

मा. अविनाश बागवे- हा विषय मान्य करावा.

**निर्णय - सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**विषय क्रमांक :- २६६०/ठराव क्र २६६४**

मा.मुकारी अलगुडे, उपमहापौर, मा.संजय बालगुडे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२३/३/२०१६ चे पत्र.

पुणे मनपाच्या नगरसचिव कार्यालयाकडील उपमहापौर कार्यालयात कार्यरत असणारे श्री. गणेश अनंत अन्नापुरे व श्री. मनोज नवनाथ बिडकर,हुद्दा -लिपिक टंकलेखक यांना नगसचिव कार्यालयाकडील आस्थापनेत वर्ग करण्यात यावे.

**निर्णय - सदर दाखल प्रस्तावावर मा.महापालिका आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.**

**विषय क्रमांक :- २६६१/ठराव क्र २६६५**

नगरसचिव कार्यालयाकडील खालील सेवकाने परदेशी (अमेरिका) जाण्यासाठी हक्काच्या रजेची मागणी केलेली आहे.त्यांचे खाती पुरेशी रजा शिल्लक असल्याने मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५७(३) अन्वये त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे खालील रजेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ७३३४ दि.२९/३/२०१६ चे पत्र.

| अ.क्र. | सेवकाचे नांव व हुद्दा | रजेचा प्रकार व मुदत |
|---|---|---|
| १) | श्री.रविंद्र निवृत्ती नितनवरे | दि.२/५/२०१६ ते ३१/५/२०१६ |

मा. अविनाश बागवे- हा विषय मान्य करावा.

**निर्णय - सदरचा विषय दाखल करून सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

विषय

नगरसचिव- हा विषय जीबी कडून आलेला आहे. पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील निरूपयोगी भंगार मालाची मोटार वाहन विभाग कार्यालयाकडील खराब झालेले टायर, ऑईल, स्पेअर पार्ट व निरस्त वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणे. यासाठी स्थायी समितीचे दोन सदस्य यांची नावे निश्चित करून द्यायची आहेत.

मा. अध्यक्ष- हा विषय कार्यपत्रिकेवर घेण्यात यावा.(दाखल विषय यादी तपासली)

विषय

शिक्षण मंडळामध्ये गरीब विद्यार्थी शिक्षण घेत असतात शिक्षण मंडळामध्ये अनेक भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत. अनेकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पुणे महानगरपालिकेचे बदनामी झालेली आहे. सन २०१६–१७ च्या साहित्य खरेदीच्या निवीदा प्रक्रियेमध्ये शंकास्पद मुदतवाढ दिली आहे, अशा अनेक गोष्टी आहेत त्यामुळे शिक्षण मंडाळाचे अधिकार काढण्यास मा. मुख्यसभेमार्फत मे. शासनाची मान्यता मिळावी.

मा. अध्यक्ष – मा. सभासदांना विनंती आहे की, सदरचा विषय मागे घ्यावा.

मा. राजेंद्र शिळीमकर– ठिक आहे सदरचा विषय मी मागे घेतो. मा. अध्यक्ष शिक्षण मंडळाचे विषय आपण गांभिर्याने का घेत नाही? शिक्षण मंडळ हे मा. महापालिका आयुक्त यांचे अधिपत्याखाली होऊ द्या. विद्यार्थ्यांना वेळेवर दर्जेदार शालेयसाहित्य आणि गणेवश मिळेल. तसेच गेल्यावेळेस अभिप्राय पाठवितो म्हणाले होते, परंतु अजून पर्यंत अभिप्राय आलेला नाही. प्रत्येक वेळेस आम्ही विषय काढणार आणि तुम्ही तो पुढील बैठकीमध्ये करू असे म्हणता. आम्ही जो केलेला ठराव आहे तो मान्यतेसाठी जाऊ द्या शासनाकडे.

मा.अध्यक्ष– लेखी अहवाल पुढील बैठकीमध्ये ठेवणार आहेत. त्यावेळे चर्चा करून निर्णय घेऊ.

मा.राजेंद्र शिळीमकर– तो पर्यंत टेंडर प्रकिया पूर्ण होईल आणि नंतर म्हणाल अरेरे हे चूकीचे झाले. शिक्षण प्रमुख यांनी मुदत का वाढविली?

मा.अध्यक्ष– शिक्षण प्रमुख तो पर्यंत टेंडर प्रक्रिया पूर्ण होईल का?

मा. बबन दहिफळे– मा.अध्यक्ष मुदतवाढ दिली नाही. ती प्रिबीड मिटींग होती त्यामध्ये त्यांनी सूचना किंवा शंका उपस्थित केल्या त्यानुसार त्यांना उत्तरे दिली व त्यासाठी ८ दिवस वाढविले.

मा. राजू पवार– कोणच्या सूचना व शंका होत्या?

मा. बबन दहिफळे– ठेकेदारांच्या.

मा. राजू पवार– मला सांगा मग अटी आणि शर्ती हे ठेकेदार ठरवणार का?

मा. राजेंद्र शिळीमकर– मा. अध्यक्ष तुम्ही सदर विषयाचे गांभीर्य घ्या अन्यथा मला उपोषणाला करावे लागेल.

मा. डॉ.सिद्धार्थ धेंडे– मा. अतिरिक्त आयुक्त जगताप यांना विचारल की टेंडर पुढे ढकलण्यासाठी तुमचे कडे आल होत का? तर ते म्हणाले नाही आणि तुम्ही त्यांना सांगितले ही नाही.

मा. मुक्ता टिळक – मग कोणाच्या अधिकारात कार्यावाही केली?

मा. बबन दहिफळे– मा. अध्यक्ष त्या निवीदे मध्ये अटी शर्ती होत्या की जर का निवीदे मध्ये चूक झाली असेल त्याची सुधारणा करायच्या असतील

मा. राजेंद्र शिळीमकर– चूकीचे असेल म्हणजे काय बोलताय तुम्ही? मग बरोबर आहे मर्जीतील ठेकेदाराला निवीदा द्यायची असेल त्या पद्धतीने सुधारणा केल्या असतील? त्यामुळे बाकीचे स्पर्धेतून बाहेर पडले.

मा. अविनाश बागवे– मा.सभासद म्हणतात ते ८ दिवस वाढविले ते कायदेशीर वाढविले की बेकायदेशीर वाढविले.

मा. बबन दहिफळे– कायदेशीर ८ दिवस वाढविले.

मा. राजेंद्र शिळीमकर– तसेच गणेवशासाठी ८ दिवस वाढविले परंतु वह्या पुस्तकांसाठी एक दिवस का वाढविला?

मा. विजय दहिफळे – मा. अध्यक्ष प्रत्येक निवीदेची मुदत वेगळी होती. तसेच या सर्व निवीदांची चौकशी करून पुढील आठवड्यामध्ये अहवाल सादर करतो.

मा. मुक्ता टिळक– शिक्षण मंडळ जरी स्वायत्ता असलीतरी त्याचा आर्थिक भार हे महापालिका उचलते. मग प्रिबीड मिटींग झाल्यानंतर महापालिकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास न आणता ८ दिवस मुदतवाढ दिली जाते अशा पद्धतीने टेंडर प्रक्रिया होत असेलतर ते योग्य नाही.

मा. राजेंद्र शिळीमकर– शिक्षण प्रमुख यांचेकडे निवीदा प्रक्रिया रद्द करून मा. महापालिका आयुक्त यांचे अधिपत्याखाली निवीदा प्रक्रिया करावी.

मा. बबन दहिफळे – याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे योग्य ते आदेश घेऊन पुढील कार्यावाही करतो.

मा. महापालिका आयुक्त– निवीदा प्रकिया पूर्ण झाली का?

मा. बबन दहिफळे– नाही.

मा.आयुक्त–ठिक आहे मग सद्य–स्थितीचा अहवाल द्या. कायदेशीर निवीदा प्रकिया असेलतर पुढील कार्यवाही करा.

<u>**कार्यपत्रिकेवरील विषय**</u>

**विषय क्र. २६१३/ठराव क्र.२६१७**

पुणे महानगरपालिका उप आयुक्त (परिमंडळ १) च्या फेब्रुवारी २०१६ च्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआप१/१२७६ दि.१८/३/२०१६ चे पत्र.

मा. अध्यक्ष– नोंद घेतली.

**निर्णय – मा. उप आयुक्त, परिमंडळ १ यांनी पाठविलेला मासिक अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.**

**विषय क्र. २६१४/ठराव क्र.२६१८**

मा.श्रीमती पुष्पा कनोजिया यांचे दि. २२/३/२०१६ चे पत्र.

नदी सुधारणा प्रकल्पामध्ये मुळा नदी सुधारणा करणेकामी आर्थिक तरतूद केलेली असून मुळा मुठा नदीमध्ये विकासकामे होणार आहेत.त्याचप्रमाणे पुणे शहर हद्दीतून बावधन,पाषाण,बाणेर मधून अजून एक वाहणारी रामनदी ही मुळा नदीमध्ये विसर्जित होते.सदर रामनदीतून पाषाण तलावात पाणी साठा होत आहे.नदी सुधारणा प्रकल्पामध्ये ज्याप्रमाणे मुळा मुठा नदीमध्ये विकासकामे होणार आहेत त्याचप्रमाणे रामनदी मध्ये देखील विकासकामे होणे अत्यंत गरजेचे आहे.तरी रामनदीचा देखील नदी सुधारणा प्रकल्पामध्ये समावेश करण्यात यावा.

**निर्णय – सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला**

मा. सुमनताई पठारे– मा. अध्यक्ष मला नदीसुधारणा बाबतच्या प्रस्तावावर बोलायचे आहे. वारजे ते खराडी नदी काठचा रस्ता हा खूप दिवस बंद आहे. तो बंद का आहे? किती दिवसांत तो रस्ता चालू होणार? बजेटमध्ये तरतूद उपलब्ध नाही का? एकतर नगर रोड भागातील बीआरटी देखील चालू नाही.

मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– मा. अध्यक्ष सदर रस्त्याची मला माहिती नाही राऊत साहेब शासकीय कामानिमित्त मुंबई येथे आहेत. पुढील बैठकीस माहिती उपलब्ध करतो.

**विषय क्र. २६१५/ठराव क्र.२६१९**

दि.१/२/२०१६ ते दि.७/२/२०१६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ६१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/१२७७ दि.१८/३/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. अध्यक्ष– नोंद घेतली.

**निर्णय– मा. अति.महा.आयुक्त(वि) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.**

**विषय क्र. २६१६/ठराव क्र.२६२०**

दि. ८/२/२०१६ ते दि. १४/२/२०१६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र.मआ/अशाद/१२७८ दि.१८/३/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. अध्यक्ष– नोंद घेतली.

**निर्णय– मा. अति.महा.आयुक्त(वि) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.**

**विषय क्र. २६१७/ठराव क्र २६२१**

दि. १५/२/२०१६ ते दि. २१/२/२०१६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र.मआ/अशाद/१२७९ दि.१८/३/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. अध्यक्ष– नोंद घेतली.

**निर्णय– मा. अति.महा.आयुक्त(वि) यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.**

**विषय क्र. २६१८/ठराव क्र २६२२**

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील सन २०१३–१४ मधील परतावा व वार्षिक विवरणपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५५३ दि.१५/३/२०१६ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३१ सन २०१५–२०१६ चा विचारासाठी.

मा. अध्यक्ष– नोंद घेतली.

**निर्णय– सह महापालिका आयुक्त, वि.का.क्र.४ यांनी पाठविलेला अहवाल अवलोकन करून नोंद घेतली.**

**विषय क्र. २६१९/ठराव क्र २६२३**

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील सन २०१३–१४ मधील परतावा व वार्षिक विवरणपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५५३ दि.१५/३/२०१६ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३१ सन २०१५–२०१६ चा विचारासाठी.

**निर्णय– सदरचा विषय मा. ऑडीट उप समितीकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. २६२०/ठराव क्र २६२४**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१४–१५ या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत केलेला लेखापरिक्षक अहवाल निर्दशनास आणणेबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे जा.क्र.मुलेप/५६० दि.१९/३/२०१६ चे पत्र.

मा. अविनाश बागवे– मा. अध्यक्ष सदर विषय पुढे घ्या. पीएमपीएमएलचे अधिकारी उपस्थित झाल्यानंतर अहवालावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेऊ.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**
**विषय क्र. २६२१/ठराव क्र २६२५**

प्रभाग क्र. ६० अ भवानी पेठ येथे मृत प्राण्याच्या दहनासाठी इन्सिनरेटर उभारणे व तदनुषंगिक सर्व कामे करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.कल्याणी एंटरप्रायझेस यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून र.रु.८६,००,०००/– पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३०७ दि. २२/३/२०१६ चे पत्र.
मा. अविनाश बागवे– याच्यामध्ये एक उपसूचना आहे. उपसूचना दिली नाहीतर प्रशासनाची अडचण होणार आहे.
मा. अध्यक्ष– प्रशासनाचे म्हणणे आहे की, उपसूचना दिल्यानंतरच प्रशासकीय कार्यवाही करता येईल.

**<u>उपसूचना</u>**

**सूचक – मा. अविनाश बागवे अनुमोदक – मा. श्रीकांत जगताप**

सदरचे काम MPCB( Maharashtra Pollution Control Board) यांची परवानगी व तसेच कामासाठी पूर्ण तरतूद उपलब्ध झाल्यानंतरच काम करणे.
**निर्णय – सदरचा विषय उपसूचनेसह मान्य करण्यात आला.**
**विषय क्र. २६२२/२६२६**

पुणे महानगरपालिका बी.आर.टी.एस. प्रकल्पाकरिता सल्लागार यांची नेमणूक करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड चे प्रकरण ५–२–(२) अन्वये खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१२८१ दि. १८/३/२०१६ चे पत्र.

१) बी.आर.टी.एस. प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून मे.अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लिमिटेड ( Urban Mass Transit Company Limited) यांची नेमणूक करणेस
२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे मे.अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लिमिटेड ( Urban Mass Transit Company Limited) संस्थेस सल्लागार फी र.रुपये ७५ लक्ष अधिक सेवा कर अदा करुन काम करुन घेण्यास व त्यांचेशी करारनामा करण्यास

मा. सुनिल गोगले – या विषयाची माहिती द्या?
मा.आयुक्त– मा. अध्यक्ष महोदय, शहरातील विविध ठिकाणी बी.आर.टी. मार्ग करणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. स्थायी समितीने बजेट मध्ये तरतूद केली आहे. तो प्रोजेक्ट राबविणे करीता त्याचे संपूर्ण डिझाईन पूर्ण बिडींग प्रोसेस करणेसाठी युएमटीसी ही संस्था भारत सरकारच्या सर्वात जास्त शेअर होल्डींग असलेली संस्था आहे. याचे अध्यक्ष भारत सरकारचे नगरविकास खात्याचे सचिव आहेत. त्यांच्या मार्फत अनेक ठिकाणी बी.आर.टी.च्या डिझाईनिंग आणि बिड प्रोसेसचे काम झालेले आहे. या संस्थेला नेमणूक करून लवरात लवकर त्यांचे मार्फत बिड प्रोसेज पूर्ण करून बी.आर.टी.ची काम पूर्ण करता येईल यासाठी हा विषय मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव सादर केला आहे.
मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे–मा.महापालिका आयुक्त ही जी कंपनी आहे. केंद्र सरकारची आपण अस सांगता. आपण बीआरटीचा प्रकल्प दोन फेज मध्ये केलेला आहे. एक पायलट बी.आर.टी. आणि दुसरी आळंदी रोड व नगररोडची बीआरटी त्यावेळेस सल्लागार आपण नेमले होते का?
मा.आयुक्त– याची माहिती खात्याचे अधिकारी देतील. याच्या मधील जे काम आहे. पायलट बी.आर.टी.चे कामकाज एकदम वेगळ्या पद्धतीने झाले होते. त्याची डिझायनींग वगैरे तसेच आताच्या बी.आर.टी.ची संकल्पना वेगळी झालेली आहे. पायलट बी.आर.टी. करताना आपण कपसाईज बसस्टॉप घेतले होते. आताच्या बी.आर.टी.चे सर्व बसस्टॉप मिडीएम असणार आहेत. पायलट बी.आर.टी.ची डिझाईन आता आपल्याला पूर्णपणे कॅरीफॉरवर्ड करता येणार नाही. नगररोड किंवा विश्रांतवाडीची बी.आर.टी. मध्ये अनेक तांत्रिक बदल आहेत. ती आपल्या सुधारता येते. ते या संस्थेच्या मार्फत होणे आवश्यक आहे. तसेच बिडींगला देखील चांगला प्रतिसाद मिळेल आणि चांगला ठेकेदार मिळेल. या संस्थेने इतर शहरांमध्ये देखील काम केलेले आहे. सद्या अमृतसर तसेच इतरही शहरामध्ये त्यांचे काम सुरू आहे.
मा.डॉ. सिद्धार्थ धेंडे– ही संस्था केव्हा पासून अस्तित्वात आहे?
मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– २००८ पासून ही संस्था अस्तित्वात आहे.
मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– तसे असेल तर आळंदी रोड आणि विश्रांतवाडीच्या बी.आर.टी.ला यांची का नेमणूक केली नाही?
मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– संपूर्ण भारतामधील १२ शहरांमध्ये बी.आर.टी.मध्ये सुधारणा करत आलेली आहेत ही संस्थेने अमृतसर मध्ये एलीव्हेटेड बी.आर.टी.ची चांगली संकल्पना माडंली आहे. त्याप्रमाणे एलीव्हेटेड बी.आर.टी.चे काम चालू आहे. सर्वात जास्त सार्वजनिक वाहतुकीचा अनुभव या संस्थेला आहे म्हणून आपण या संस्थेची नेमणूक करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.
मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– त्या भागातील आजचा स्टेटस रिपोर्ट काय आहे? त्या शहरामध्ये बी.आर.टी. चालू आहे का?
मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– पंजाब मध्ये दोन शहरात त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. अहमदाबाद मध्ये प्रस्तावित आहेत.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– माझ्या माहिती प्रमाणे भारतामध्ये पुणे आणि अहमदाबाद सोडले तर कुठेच बी.आर.टी. चालू नाही.
मा. महापालिका आयुक्त – मा.स्थायी समितीने ५० कोटी एवढा निधी या कामासाठी उपलब्ध केला आहे. सदरची संस्था ही भारत सरकारची असल्याने या संस्थेला एक टक्का कमिशन देणार आहे. तसेच आपल्याकडील कन्सल्टंन यांना आपण दोन ते अडीज टक्के कमिशन देत आहोत. चांगली संस्था आपल्यासोबत राहील काम चांगल झाल तर त्या निधीचा सदुपयोग होणार आहे आणि चांगल्या प्रकारची बी.आर.टी. करता येईल.
मा. मुक्ता टिळक– आयएलएफएसला आपण २००८ मध्ये काम दिले आणि २०१३ पर्यंत तुमच्या डॉकेट नुसार मुदत होती. आता त्यांना या कालावधीमध्ये काही रक्कम जसे तुम्ही म्हणता की, दोन अडिच टक्के मग त्यांना किती रक्कम अदा केली याची माहिती द्यावी? दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्या प्रोजेक्ट रिपोर्टवर आपण काय कामे केली?
मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– आयएलएफएसला आपण जे काम दिले होते त्याच्यामध्ये ते दोन टप्प्यातील काम होत. पहिला टप्पा होता की डिपीआर तयार करणे आणि तो राज्य व केंद्र शासनाकडून मंजूर करणे. त्यासाठी २.०५ टक्के होते आणि २.५० टक्के होत ते बिड प्रोसेस मॅनेजमेंट आणि पुढे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटन्सी. डिपीआर तयार करण्याचे काम त्यांनी पूर्ण केले.त्या प्रितर्थ त्यांची फी अदा केली आहे. आता आपण नव्या पद्धतीची बी.आर.टी. तयार करतोय त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभा करणे आवश्यक आहे.
मा. मुक्ता टिळक– ज्या ठिकाणी आयएलएफएसने काम केल त्याच रस्त्यावर बी.आर.टी. होणार आहे का? दुसऱ्या रस्त्यावर होणार आहे? म्हणजे त्यांनी ज्या रस्त्याचे डिझाईन केले.
मा. महापालिका आयुक्त– पूर्वी जो आपल्याकडील काही डिझाईन पूर्ण झाले नाही. फक्त आपल्याकडे काही रस्ते आयडेन्टीफाय केले होते. तेच प्रोजेक्ट मध्ये होते. आता आपल्या डिटेल डिझाईन आणि इस्टीमेट करावे लागणार आहे. नवीन बस स्टॉपची देखील डिझाईन करावी लागणार आहे. आता आपण विश्रांतवाडी आणि संगमवाडी येथे बस स्टॉप केले आहेत ते थोडे मोठे आहेत. ते लहान करण्याची गरज आहे. रोड स्पेस वाचवता येईल हे पाहण्याची आवश्यकता आहे. या नंतर परत आपणाला डिझाईन करताना काही ठिकाणी डबल साईडेड करावे लागणार आहेत. हे सर्व ऑन द ग्राऊंड फिजीकली प्रत्येक किलो मिटर जाऊन करावे लागणार आहेत. ५० कोटी खर्च करून आपण १५ किलो मिटर बी.आर.टी. करणार आहेत. सरासरी एक किलो मिटर बी.आर.टी.ला ४ कोटी इतका येतो. ज्या संस्थेला भारता मध्ये सर्वांत जास्त कामाचा अनुभव आहे. तसेच भारत सरकारचे सचिव आपल्या सोबत काम करणार आहे. त्यामुळे आपल्याला हे काम चांगल्या प्रकारे करून घेता येईल.
मा. मुक्ता टिळक– यात आमच दुमत नाही. महापालिकेचे पैसे वाचत असतील तर स्वागतच आहे. माझा मुद्दा असा आहे. आपण अशा पद्धतीचे आता पर्यत सीएमपीचे अहवाल तयार करून घेतले अजून कोण–कोणते अहवाल तयार करून घेतले म्हणजे पुन्हा परत पहिल्यापासून सुरूवात अशी प्रत्येक अहवालाची स्थिती अशी होणार असेल तर आपण केलेल्या खर्चाची काही अर्थ राहणार नाही. त्यामुळे या कंपनीला आपण सल्लागार म्हणून नेमू तेव्हा त्याचा कालावधी निश्चित केला पाहीजे. त्यांनी या कालावधीत हे काम पूर्ण केले पाहीजे आणि त्याचा कार्यवाही करणेसाठी महापालिकेकडून झाली पाहीजे. आपल्याकडे असे कित्येक तरी अहवाल कार्यवाही विना पडून आहेत.
मा. महापालिका आयुक्त– अगदी बरोबर मुद्दा आहे. सीएमपी ही कॉंप्रेसीव्ह मोबेलीटी प्लॅन आहे. त्याच्या मध्ये ड्रॉईंग आणि इस्टिमेटस नाहीत. सीएमपी ने २००९ मध्ये जो बीआरटी प्लॅन सूचविला आहे. त्याप्रमाणे कार्यावाही केली तर आपली वाहतुकीची समस्या ६० टक्के पूर्ण होणार आहे. आपण सीएमपीचा बेस घेऊन ड्रॉईंग आणि इस्टिमेट करणार आहोत. रस्ते तयार करताना देखील आपण कन्सलटंट नेमतो, त्यांना २ ते २.५० टक्के फी देतो. या प्रोजेक्ट मध्ये ५० कोटी खर्च करून भारत सरकारची एजन्सी नेमून त्यांना १ टक्का फी देणार आहे. महापालिकेचे पैसे देखील वाचतात आणि भारत सरकारची एजन्सी असल्याने बी.आर.टी.चा प्रोजेक्ट चांगला करतील.
मा. अविनाश बागवे– मा. आयुक्त आपण रेनबो बी.आर.टी. साठी कन्सलटंट नेमला होता का?
मा. युवराज देशमुख, कार्यकारी अभियंता(पथ) – तो आपलाच प्रकल्प होता. त्यासाठी कन्सलटंट नेमला होता.
मा. अविनाश बागवे– एकदा कन्सलटंट कडून आयडीया घेतली मग इस्टिमेटसाठी कशाला दुसरा कन्सटंट नेमायचा आहे?
मा. युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ) – बी.आर.टी. प्रोजेक्ट मध्ये चांगल्या प्रकारे सुधारणा करण्याचा स्कोप आहे.
मा. अविनाश बागवे– हो तेवढ तरी काम आपले अधिकारी करू शकत नाही का? आपल्याकडे मनुष्यबळ नाही का?
मा. युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ) – बेसकली आपल्या चौकांचे कठडे चोरीला जातात त्यामुळे पादचाऱ्यांची गैरसोय होते.
मा. अविनाश बागवे– आपल्याकडे मनुष्यबळ नाही का?
मा. युवराज देशमुख, कार्यकारी अभियंता(पथ)– सुरक्षेततेच्या गोष्टी देखील आहेत.
मा. अविनाश बागवे– सुरक्षे बद्दल तर मग न बोललेल बरं आहे. बी.आर.टी.चे कठडे, रेलींग आणि बरेच काही चोरीला गेले आहे. बी.आर.टी.साठी आपण परत ८२ लाख खर्च केले आहेत.
मा. सुनिल गोगले– मा. अविनाशजी माझे म्हणणे आहे की, बिआरटी प्रत्यक्ष जागेवर चालू आहे. त्याच्या मध्ये अजून सुधारणा करायची गरज एंकदरीत विषयपत्र वाचल्यावर समजते. हा विषय मान्य केला पाहीजे.

मा. अविनाश बागवे– सर्वात महत्वाचे म्हणजे शासनाची संस्था आहे आणि ती सल्ला द्यायला पैसे घेते ही कल्पना मला पटत नाही. खाजगी संस्था असतीतर काय वाटत नाही. उद्या मग शासनाच्या नगरविकास विभागाकडून अभिप्राय घ्याचा झाला तर त्याला पण पैसे द्यावे लागतील. ठिक त्या संस्थेला प्रेझेंटशन करायला सांगा मग विषय मान्य करू.
मा. महापालिका आयुक्त– ही कंपनी आहे भारत सरकारची टू वन परसेंट शेअर होल्डिंग आहेत. सभागृहाने त्यांचेवर विश्वास ठेवून हा विषय मान्य करा जेणे करून लवकरात लवकर काम सुरू करता येईल.
मा. राजू पवार– हा विषय मान्य करा, नंतर प्रेझेंटशन द्या.
मा.सिद्धार्थ धेंडे– मा. आयुक्त त्या कंपनीने आपणाकडे प्रेझेंटेशन दिले असेल ना मग तुम्ही प्रेझेंटशन द्या मग पुढील आठवड्यामध्ये विषय मान्य करू.
मा. अविनाश बागवे– माझी प्रामाणिक विनंती आहे की, या अगोदर देखील आपण बी.आर.टी.साठी सल्ला घेतला आहे. उर्वरित कामे करणेसाठी आपले अधिकारी सक्षम आहेत. थोड्या त्रुटी असतील त्या आपण चर्चा करून दूर करू शकतो.
मा. महापालिका आयुक्त – संबंधीत अधिकाऱ्यांनीच सांगावे की, आवश्यकता आहे की नाही?
मा.अविनाश बागवे– जर अधिकारी सक्षम नसतील तर सर्व नगरसेवकांची बैठक ठेवा ते तुम्हा चांगल्या सूचना करतील.
मा. महापालिका आयुक्त– सदरची संस्था १२ शहरामध्ये काम करते म्हणून असे म्हणू शकत नाही की त्या शहरातील अधिकारी सक्षम नाहीत.
मा. अविनाश बागवे– १२ शहरे कोणती ती आम्हाला माहिती नाहीत, परंतु पुणे शहर हुशार आहे.
मा. सिद्धार्थ धेंडे– संपूर्ण भारतामध्ये पुण्यात पहिली बी.आर.टी. झाली आहे. आम्ही विषय अमान्य करत नाही. आम्हा प्रेझेंटशन मधून एवढीच माहिती घ्यायची की काय सुधारणा केल्यात आणि भविष्यात काय करता येईल.
मा. महापालिका आयुक्त– मा. स्थायी समितीने या प्रोजेक्टसाठी एवढा मोठा निधी उपलब्ध केला आणि लवकरच निवडणुका येतील आचारसंहिता लागेल मग प्रत्यक्षात कार्यवाही करण्यासाठी उशीर होईल. तसेच या कालावधीमध्ये तज्ञ संस्था आपल्यासोबत कामासाठी राहणे हे केव्हाही योग्य आहे. त्याचा विचार करून आम्ही जवळपास दोन महिने चर्चा करतो, त्यावर कसे काम करायचे ते नियोजन करून हा प्रस्ताव समितीपुढे मान्यतेसाठी सादर केला आहे.
मा. अविनाश बागवे– मा.आयुक्त, तुम्ही ज्या गोष्टी सांगता त्यावर आपण वर्ष,दोन वर्षे आणि तीन वर्षात किती कन्सलटंट नेमले आहेत. आता प्रत्येकाची अकौंटीबिलीटी काढायची का? नवीन प्रपोजल करायचे असेल तर त्यासाठी तुम्ही कन्सलटंट नेमा. परंतु आपण अगोदर फेज १, रेनबो बी.आर.टी आपण केली आहे. मॉल मध्ये आपल्या रेनबो बी.आर.टी.च्या जाहीराती येतात. बी.आर.टी.मध्ये केलेल्या सुधारणा तसेच चांगल्या पद्धतीने केलेल्या प्रोजेक्टच्या १ ते २ मिनीटांच्या क्लिप दाखविल्या जातात. एवढे सगळे होत असताना आपण फक्त काय नावचे मार्केटींग करतो की काय असा मला प्रश्न पडतो?
मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– ३० टक्के प्रवासामध्ये वाढ झाली आहे. आम्ही स्वत– पाहतो. जाहीरात येते. सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ११.०० पर्यंत बस मध्ये उभे राहण्यासाठी जागा मिळत नाही अशी वस्तुस्थिती आहे. विश्रांतवाडीच्या बसमध्ये तुम्हाला जागाच मिळणार नाही.
मा. अविनाश बागवे– मा. अध्यक्ष अशी परिस्थिती असताना मग आपण पुन्हा दुसऱ्या कंपनीला ७६ लाख रूपये मोजायचे का? हा आपण विचार केला पाहीजे.
मा. राजू पवार– सांगवी पासून ते थेरगाव पर्यंत पाहील तर बी.आर.टी. प्रकल्प खूच चांगल्या पद्धतीने केला आहे.
मा. महापालिका आयुक्त– आयबीआय कन्सलटंट आज पर्यंत काम करत आहेत.
मा. राजू पवार – मग त्या धर्तीवर प्रकल्प करायला काय अडचण नाही.
मा. सिद्धार्थ धेंडे– त्यांचे पेमेंट शेड्युल्ड कस असणार?
मा. राजू पवार– जस काम होईल तसच त्यांचे पेमेंट काढा त्यांना ॲडव्हान्स देऊ नका? हा विषय मान्य करा. पुढील मंगळवारी प्रेझेंटेशन द्या.
मा. सौ. अश्विनी कदम– नाही मला वाटतय की पहिलं, प्रेझेंटेशन द्या आणि नंतर विषय मान्य करा.
मा. महापालिका आयुक्त– हा विषय जरी मान्य झाला तरी या कामाला ५ ते ६ महिने जाणार आहे. दरम्यानच्या काळात वेळोवेळी बैठका घेऊन कामकाजाचा अहवाल दिला जाईल.
मा. सिद्धार्थ धेंडे– कन्सलटंट नेमण्यासाठी आपण आठ दिवस थांबू शकत नाही हे काय माझ्या बुद्धीला पटत नाही.
मा.आयुक्त– कन्सलटंट शेवटी प्रोजेक्ट डिझाईन करणार आहे. प्रोजेक्ट डिझाईन करणारे कन्सलटंट हेही असू शकतात किंवा तेही असू शकतात. परंतु या संस्थेने सर्वात जास्त प्रोजेक्ट हँडल केलेत म्हणून आम्ही यांना प्रस्तावित केले आहे. हा जो प्रोजेक्ट डिझाईन करणार आहे. त्यावर काय सुधारणा करायची आवश्यकता आहे का? किंवा कसे? याबाबत आपले मत जाणून घेणार आहे. कन्सलटंट हे इतर ठिकाणी काय कामे केली त्याच्यावर प्रेझेंटेशन करणार. त्यांनी पुण्यात काम केलेले नाही. त्यामुळे पुढचे काय असणार हे आपल्या लक्षात येणार नाही. आपण या संस्थेचा डिझायनिंगचा जो कालावधी राहील त्यानंतर आपल्या सर्वांची मिटींग लावून त्या डिझाईन मध्ये ज्या सुधारणा असतील ते प्रस्तावित करा. त्याचा अंतर्भाव केला जाईल.
मा. अविनाश बागवे– मा. आयुक्त साहेब आपला अनुभव रेनबो बी.आर.टी. चांगल झाली. मग तो कन्सलटंट काम आपण रिपीट करत नाही. दुसर मा. राजू पवार यांनी सांगवी येथील बी.आर.टी. चे उदाहरण दिले आहे मग ते करा.

मा. सिद्धार्थ धेंडे– बरोबर आहे आणि रेनबो बी.आर.टी चालू झाल्यानंतर एकही कॅज्युल्टी झाली नाही. नॉट अ सिंगल ॲक्सिटेंड.

मा.आयुक्त– याच्या मध्ये आपल्याला काही गोष्टींची सुधारणा करणे शक्य आहे. बस स्टॉप चे डिझाईन वगैरे. शेवटी रेनबो बी.आर.टी. जरी चांगली असली तरी ही बी.आर.टी. आपण नवीन रूटस वर करणार आहोत. रूटस च्या परिस्थितीप्रमाणे वाहतुकीप्रमाणे त्याठिकाणी आपल्याला डिझाईन करणे आवश्यक आहे. एक्झॅक्टली रेप्लीका आपल्याला उचलून दुसऱ्या रस्त्यावर आणणे शक्य होणार नाही. त्यासाठी हा प्रस्ताव मान्य करावा.

मा.अविनाश बागवे– मा. आयुक्त तुम्ही एवढा आग्रह करताय म्हणून मान्य करतो.परंतु त्याचे प्रेझेंटेशन नक्की द्या.

मा.आयुक्त– मा. अध्यक्ष याचे प्रेझेंटेशन दिले जाईल.

मा.सौ.अश्विनी कदम– मा.अध्यक्ष पुणे–सातारा रोड वरील बी.आर.टी. ही पुणे शहरातील पहिली बी.आर.टी. आहे. त्याची दुरावस्ता झालेली असून दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मग तुम्ही याच सल्लागार यांचेकडून करून घ्या नाहीतर त्यासाठी पण वेगळा सल्लागार वेगळी फी द्यावी लागेल.

मा.युवराज देशमुख,कार्यकारी अभियंता(पथ)– मा. अध्यक्ष सदरचे काम देखील त्यामध्येच करण्यात येईल.

**निर्णय – सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला**

**विषय क्र. २६२३/ठराव क्र २६२७**

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर भारतीय सौर उर्जा निगम यांनी नियुक्त केलेल्या Clean Max Enviro Energy Solutions Pvt. Ltd. व Hero Solar Energy Pvt.Ltd या यशस्वी कंपन्यांकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर RESCO ( Renewable Energy Service Companies) मॉडेल पध्दतीने ग्रीड कनेक्टेड रुफटॉप सोलर पी.व्ही सिस्टिम उभारणेस व त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील अनुसूची ड प्रकरण ५(२)(२)अन्वये आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करणेच्या प्रस्तावाचा फेरविचार होवून मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१२६० दि. १५/३/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २२/३/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

मा. सौ. अश्विनी कदम– या विषयाला उपसूचना आहे.

मा. मुक्ता टिळक– एकीकडे पाण्याची कमतरता त्यामुळे आपल्याला पाण्यापासून वीज मिळत नाही आणि अशा परिस्थितीत आपल्या सोलरची एजन्सी मिळते तर ते घ्यायला काय हरकत आहे?

मा. डॉ.सिद्धार्थ धेंडे– मा. अध्यक्ष, मा.आयुक्तसाहेबांनी हा विषय नेमका काय आहे? हे सांगाव.

मा.आयुक्त– मा. अध्यक्ष महोदय, आपल्याकडे रूफटॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम मधून वीज निर्मिती करण्याचा हा विषय आहे. या संस्थेने पूर्ण भारतासाठी उद्दीष्ठ ठरविले आहे की कोणत्या राज्यामध्ये सोलरव्दारे वीज निर्मिती करायचे आहे. वीज निर्मित करण्याचा प्रश्न महापालिकेशी कसा आला कारण महापालिकेकडे अनेक इमारती अशा आहेत. ज्याच्या छतावर आपण सोलर सिस्टीम राबवू शकतो. त्याच्या माध्यमातून महापालिकेची वीज बचत होणार आणि वीज खरेदीचा आर्थिक बोजा पडणार नाही. सदरची रेस्को एजन्सी ही फ्री ऑफ कॉस्ट काम करणार आहे. पुणे मनपामध्ये विशेष असा प्रयोग होत नाही. तर संपूर्ण भारतात ही एजन्सी काम करीत आहे. त्यामुळे आपण रिक्स वगैरे घेत नाही. महापालिकेचे आर्थिक नुकसान देखील होणार नाही. या कंपनीला शॉटफॉर्म मध्ये रेस्को म्हणतात. रेस्को मॉडेल असा आहे की, आपण एमएसईबी कडून पॉवर खरेदी करतोय ही सिस्टीम राबविल्यानंतर आपल्याला एमएसईबीकडून वीज खरेदी न करता रेस्को कडून वीज खरेदीची हमी त्यांना द्यावी लागणार आहे. आता ही हमी देताना आपल्याला काही निकष पहावे लागणार आहेत की वीज आपल्याला कोणत्या दराने मिळणार आहे त्या पेक्षा ही वीज आपल्याला स्वस्त आहे की नाही? हे पाहील्यानंतर खरचं वीज स्वस्त दराने मिळाणार असेलतर पुढील कार्यवाही करू. १०.६० रूपये इतका एमएसईबीचा प्रती युनिटचा दर आहे. आज मेडानी सोलर पॉवरसाठी नवीन टेंडर करून त्यांनी जे दर फाईनल केले ते ७.३२ रूपये इतका आहे. आपण त्याच्या पूर्वी केंद्र शासनाने जे टेंडर केले होत मध्ये या सोलर एनर्जी कॉर्पोरेशनने टेंडर केले होते. त्यामध्ये ५.६० रूपये इतका दर आला आहे. त्या धर्तीवर आपण पाहील तर ५ रूपये प्रती युनिट वीज दरात बचत होत आहे. शेवटी याच्यामध्ये आपला खर्च नाही. रेस्को मॉडेल असा आहे की रूफटॉप सोलर पी.व्ही.सिस्टीमसाठी लागणार ८ ते १० कोटी गुंतवणूक स्वत– न करता या कंपनीने करावे. पारदर्शक निवीदा प्रकियेव्दारे निवड झाली आहे. महापालिकेच्या इमारतीच्या छतावर कंपनीने ही सिस्टीम राबविल्यानंतर त्यांचेकडून आपण वीज खरेदी करायची आहे. हा करार २५ वर्षाचा असणार असून १० कोटी रूपयांचे गुंतवणूक आहे. वीजेची बचत हा महापालिकेचा फायदा आहे आणि वीज निर्मिती करताना कंपनीला १.५० रूपये इतका प्रती युनीट फायदा होणार आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली तर असे निदर्शनास आले की महापालिकेला एकूण १६ ते १७ मेगावॉट इतकी वीज लागते. हा आपला पहिला प्रयोग असल्याने आपण फक्त एक मेगावॉट वीज निर्मिती करणार आहे. पुणे महानगरपालिकेची सोलर सिटी या नावाने ओळख निर्माण करण्याचा देखील प्रयत्न आहे. केंद्र शासनाकडून काही मोजक्या शहरांची सोलर सिटीमध्ये निवड करण्यात येत आहे. त्यामध्ये पुणे शहराचा देखील समावेश आहे. महापालिका प्रायोगिक तत्वावर एका मेगावॉट वीज निर्मिती करेल त्याचा आधार घेऊन ३० ते ५० मेगावॉट पर्यंत वीज निर्मीती करू शकतो. आपल्याकडे मोठे स्टेडियम, हॉटेल, हॉस्पिटल आणि कॉम्प्लेक्स आहेत. त्यांच्या छतावर हा प्रयोग करता येईल. हे अत्यंत चांगले काम कोणताही खर्च न करता आपल्या शहरामध्ये होऊ शकते. प्रदुषण कमी करणार शेवटी इलेक्ट्रीसीटीचा वापर कमी करणार. हा पर्यावरणपुरक असा उपक्रम असणार आहे. हा उपक्रम झाल्यास महापालिका

इतर शहरांसमोर एक चांगले उदाहरण ठेवणार आहे. तीनही बाजूंनी फायदा होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करावा, ही विनंती आहे.

मा. डॉ.सिद्धार्थ धेंडे– मा. आयुक्तांनी आता जे निवेदन केले आहे. मेडाचे ऑफिस माझ्या वॉर्ड मध्ये आहे. मी या मेडाच्या ऑफिसमधील सोलर पॉवरचे जे हेड आहेत. मी त्यांच्याशी चर्चा केली. मेडाचा जो लेटेस्ट रिपोर्ट आहे. मी त्यांना विचारणा केली की एक मेगावॅट युनीट एवढी सोलर एनर्जी वाढवायची असेल तर त्याच इन्फ्रास्टक्चर कस असायला पाहीजे. त्याचे एक्सपेंडीचर आणि मेंटनन्स किती येतो? त्याच टोटल वर्किंग कस होतय? मा. आयुक्तसाहेब तुमच्या माहिती करीता सांगतो की, एक मेगा युनिट करता टोटल प्रोजेक्ट कॉस्ट इन्क्लुडींग इन्फ्रास्टक्चर ६ कोटी रूपया पेक्षा जास्त खर्च येणार आहे. ६ कोटीमध्ये तुम्ही रेस्कोचे प्रोजेक्ट आणि त्याच्यामध्ये प्रति वर्षी ६० लाख युनीट वीज निर्मीती होऊ शकते. तुम्ही जो बाजारभावाचा रेट सांगता १०.५० रूपये एसएमईबी कडून घेतो. म्हणजे १६ लाखाने जर त्याला गुणले तर १ कोटी ६० लाख रूपये वर्षाला आपले वाचत आहेत आणि हे १ कोटी ६० लाख रूपये होणारी बचत ही २५ वर्षाकरीता त्या रेस्को कंपनीला देण्या ऐवजी तो प्रोजेक्ट आपणच राबविला तर ते योग्य होईल.

मा.आयुक्त– मा. अध्यक्ष महोदय हा विषय अगदी बरोबर आहे. याची एनलीसीस आपण केली आपण स्वतः तो लावला किंवा त्यांच्याकडून करून घेतला तर इकनॉमिक कस वर्कआऊट होतय अधिकाऱ्यांनी त्याचवर उत्तर द्याव आणि आपण मॅथेमॅटीकक्स मध्ये गेलो तर महानगरपालिकेचा याच्यामध्ये फायदाच झाला पाहीजे नुकसान होता कामा नये. आता प्रयास नावाची संस्था आहे. जी पीआयसी सोबत काम करते. या क्षेत्रातील संपूर्ण देशभरामध्ये काम करणारी या क्षेत्रातील सर्वात चांगली एनजीओ आहे. त्या प्रयासच्या लोकांनीही आमच्या सोबत बसून कॅलक्युलेशन केले आहे. आपण ते पाहून घ्या नंतर हा निर्णय घेता येईल.

मा. चौधरी, उप आयुक्त तांत्रिक–मा. अध्यक्ष महोदय यामध्ये आपले १५ ते १६ लाख युनिट प्रतीवर्षी वीज निर्मीती होणार आहे. ५.५९ रूपये त्यांनी आपल्याला दर दिलेला आहे. सोलरसाठी ७.५८ रूपये इतका दर दिला आहे. आपण दोन रूपये कमी दराने आपण वीज खरेदी करणार आहे. जनरेशन कॉस्ट आपण जर केली तर ती ६ रूपयाच्या आसपास जातील.टोटल कॅपिटल इन्वेस्टमेंट परफॉर्मन्स गॅरंटी, मेंटनंन्स आणि त्याच्यामध्ये सबसिडी नंतर आपल्याला लाभ होणार नाही म्हणजे १५ टक्के सबसिडी घेऊन त्यांना अलॉव केले आहे.

मा. डॉ.सिद्धार्थ धेंडे– चौधरीसाहेब आम्ही प्रोजेक्ट बद्दल विचारत आहे. त्यांना सबसिडी मिळणार आहे त्याचा आपला काय संबंध आहे. मी तुम्हाला साध गणित विचारतो आपण १६ लाख युनीट प्रत्येक वर्षाला खरेदी करायच्या ऐवजी आपण तयार केली तर आपले १.६० कोटी वर्षाला बचत होते.

मा. चौधरी उप आयुक्त तांत्रिक– त्यासाठी आपल्याला भांडवली गुतंवणूक करावी लागणार आहे.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– मान्य आहे भांडवली गुतंवणूक ६ कोटीची आहे.

मा. चौधरी उप आयुक्त तांत्रिक– नाही ८ कोटीची आहे.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– त्यांची नाही तुमची सांगा हे मेडाचे कालची माहिती आहे ते खोटे बोलणार आहे का?

मा. चौधरी उप आयुक्त तांत्रिक– मा.अध्यक्ष त्याची तपासणी करतो.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– काय तपासता त्यांचे पुस्तक आहे. त्यांचा ऑडीट अहवाल देखील आहे.

मा.सुनिल गोगले– हा प्रस्ताव तुम्ही आणला महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचा काय अभ्यास आहे फक्त तोंडी अभ्यास आहे का?

मा. चौधरी उप आयुक्त तांत्रिक– त्यांनी भांडवली गुतंवणूकीचा रेट ८ कोटी दिलेला आहे. (गोंधळ)

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– कोणी कंपनी, कन्सलटंट येते काहीही तुम्हाला सांगता त्यावर तुम्ही आभ्यास देखील करत नाही. तुम्ही स्वत– मेडा मध्ये गेला होता का?

मा. चौधरी उप आयुक्त तांत्रिक– आम्ही मेडा कडून माहिती घेतलेली आहे.

मा.सुनिल गोगले– हा विषय दप्तरी दाखल करा आणि परत मा.स्थायी समितीकडे आणू नका.

मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे– नक्कीच दप्तरी दाखल केला पाहीजे यात महापालिकेचे आर्थिक नुकसान आहे.

मा.सौ.अश्विनी कदम– दप्तरी दाखल करा. प्रशासन असे चुकीचे विषय समितीपुढे कसे काय आणतात?

मा.राजेंद्र शिळीमकर– हा प्रस्ताव मान्यतेसाठी आला आहे, मग त्यावर मतदान घ्या. महापालिकेच्या हिताचा विषय प्रशासनाने नाही आणायचा तर मग कसले विषय आणायचे?

मा.सौ.अश्विनी कदम– हा विषय महापालिकेच्या हिताचा नसून आर्थिक नुकसान करणार विषय आहे.

मा.आयुक्त– मा.अध्यक्ष महोदय, सभासदांनी उपस्थित केलेल्या मुद्दांबाबत सखोल माहिती घेण्यासाठी वेळा द्यावा. तसेच प्रयास संस्था आणि आपले अधिकारी एकत्र बसून योग्य नियोजन करतो.

मा.राजेंद्र शिळीमकर– ठिक आहे मग ८ दिवस हा विषय पुढे घ्यावा.

मा.सौ.अश्विनी कदम– मा. अध्यक्ष समितीचे सभासदांची मागणी आहे हा विषय दप्तरी दाखल करायचा यात महापालिकेचे आर्थिक नुकसान आहे. त्या विषयाला मा. आयुक्त एवढे आग्रही का आहेत? हा विषय दप्तरी दाखल करावा.

मा.फारूख इनामदार – अनुमोदन आहे.

नगरसचिव– विषय क्र २६२३ दप्तरी दाखल करण्यासाठी उपसूचना आली आहे. या उपसूचनेला कोणाचा विरोध आहे का?

मा. मुक्ता टिळक– आमचा विरोध आहे.

नगरसचिव– या उपसूचनेला अनुकूल असणारांनी कृपया हात वर करावे.

मा.सौ. अश्विनी कदम– मा.नगरसचिव हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी अनुकूल असणारे का?

नगरसचिव– होय,

मा. राजेंद्र शिळीमकर– मा.अध्यक्ष, मतदान घेऊ नका हा विषय ८ दिवस पुढे जाऊ द्या. मतदानाची प्रथा पाडू नका.

मा.सुनिल गोगले– या विषयावर माझे मत मांडतो.

मा. राजू पवार– अहो, आता मतदान चालू आहे आता मत मांडून काय फायदा?

मा. सुनिल गोगले– विषय दप्तरी दाखल करा. तुमच्या सर्वांच्या मताशी मी सहमत आहे. ज्या सभागृहमध्ये चेअरमन आणि आयुक्त बसतात. त्यांचा मान ठेवून हा विषय ८ दिवस पुढे घ्यावा.(गोंधळ)

मा.सौ.अश्विनी कदम– हा विषय दप्तरी दाखल करावा.

मा.मुक्ता टिळक– हा विषय ८ दिवस पुढे घेण्यासाठी उपसूचना देऊ का?

नगरसचिव– मतदान चालू आहे, हा विषय दप्तरी दाखल करण्यासाठी प्रतिकुल असतील त्यांनी कृपया हात वर करावा. अनुकूल १२ आणि प्रतिकुल ३ विषय दप्तरी दाखल करण्याची उपसूचना बहुमतांनी संमत.

<u>उपसूचना</u>

**सूचक – मा. श्रीमती. सुशिला नेटके** **अनुमोदक – मा.राजू पवार, मा.सौ. आरती बाबर**

**विषय क्र. २६२३ दप्तरी दाखल करण्यात यावा.**

**निर्णय – सदरचा विषय दप्तरी दाखल करण्यात आला.**

**विषय क्र. २६२४/ठराव क्र २६२८**

पुणे शहराच्या महत्वाच्या योजना गती देण्याकरीता व योग्य सनियंत्रण करण्याकरिता शहर परिवर्तन कक्ष स्थापित करणेसाठी पुणे सिटी कनेक्ट संस्थेसोबत पुणे महानगरपालिकेला करार करणेस व पुणे महानगरपालिकेचे वतीने मा.महापालिका आयुक्त यांनी करारावर स्वाक्षरी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/१२८३ दि. १९/३/२०१६ चे पत्र.

मा.आयुक्त–मा. अध्यक्ष महोदय, या विषयामध्ये सद्य–स्थितीत काही दुरूस्त्या करणे आवश्यक असल्याने सदरचे विषयपत्र मागे घेऊन पुढील बैठकीमध्ये सुधारित विषयपत्र सादर करणार आहे.

**निर्णय – मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र मागे घेण्यात आले.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**